# ट्रंपना सुबुध्दी, निर्यातीला मिळणार गती

गेल्या वर्षी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अगोदर भारतातून आयात होणाऱ्या वस्तूंवर १८ टक्के कर लावला. त्यानंतर भारताने रशियाकडून कच्च्या तेलाची खरेदी बंद न केल्याने आणखी २५ टक्के कर लादला. आणखी सात टक्के कर वाढवून भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूंवर पन्नास टक्के कर लावला. इराणमधील कंपन्यांशी व्यवहार केल्यास आणखी २५ टक्के कर लादण्याची धमकी दिली. रशियाकडून आणखी कच्चे तेल खरेदी केले, तर पाचशे टक्के कर लादू, अशी धमकी द्यायलाही त्यांनी कर्म केले नाही. जगातील अनेक देश ट्रम्प यांना घाबरून अमेरिकेबरोबर व्यापार करार करत असताना भारत मात्र अमेरिकेला दाद द्यायला अजिबात तयार नव्हता. ट्रम्प वारंवार आपल्या विधानांवरुन 'यू टर्न' घेत होते. भारतातून वस्तू आयात करण्यावर टॅरिफचे गतिरोधक ट्रम्प यांनी बसवले खरे; परंतु त्याचा भारताला बसला, तसाच किंबहुना त्याहून अधिक फटका अमेरिकेला बसला. अमेरिकेमध्ये महागाई वाढायला लागली. मंदीचे संकट यायला लागले. मूठभर लाळघोटे स्तुतीपाठक वगळता अमेरिकेतील तज्ज्ञ मात्र ट्रम्प यांच्या निर्णयाच्या दुष्परिणामांची जाणीव करून देत होते. अमेरिकन जनताही ट्रम्प यांच्या विरोधात कधी नव्हे एवढ्या मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरली होती. अमेरिकेच्या संसदेत तसेच न्यायालयातही ट्रम्प टॅरिफला विरोध व्हायला लागला होता. असे असताना भारत आणि अमेरिकेदरम्यान व्यापार करार झाला. अर्थात हा करार ट्रम्प यांच्या मनासारखा झालेला नाही. आज भारत जगाची गरज बनला आहे. जगभरातील देश भारताकडे आशेने पाहत आहेत. कदाचित याच कारणामुळे ट्रम्प यांना भारतासोबत करार करण्यास भाग पडले.

आज भारताने जागतिक स्तरावर आपली प्रतिमा बदलली आहे. आज भारत स्वतःच्या अटींवर बोलतो. भारताचा धोरणात्मक आणि निर्णायक राजकीय मुत्सद्दीपणा यामध्ये भूमिका बजावत आहे. भारताने जागतिक स्तरावर एक विश्वासार्ह देश म्हणून आपली प्रतिमा स्थापित केली आहे. त्याच वेळी, स्वतःच्या गरजांशी तडजोड केलेली नाही. रशियाकडून तेल खरेदी करणे असो किंवा रशियाबद्दल भारताचा दृष्टिकोन; जागतिक स्तरावर एक मजबूत देश म्हणून भारताची प्रतिमा निर्माण झाली आहे. भारताने आपली राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक हितसंबंध संतुलित करताना एका प्रमुख मित्रासोबत संबंध सुधारण्यासाठी व्यावहारिक आणि निर्णायक राजनैतिक पाऊल कसे उचलले, याचे हे उत्तम उदाहरण आहे. भारतातील खरेदी शक्ती वेगाने वाढली आहे. वाढत्या उत्पन्नामुळे लक्झरी आणि आवश्यक वस्तूंच्या मागणीत झपाट्याने वाढ झाली आहे. जग भारताच्या विशाल बाजारपेठेकडे लक्ष देत आहे. जगातील कोणताही देश भारताच्या या ताकदीकडे दुर्लक्ष करू शकत नाही. भारताने अलिकडच्या काळात युरोपीय महासंघ, ब्रिटन, न्यूझीलंड आणि ओमानसारख्या देशांसोबत मुक्त व्यापार करार केले. या धोरणामुळे भारताला कोणत्याही एकाच बाजारपेठेवरील अवलंबित्वापासून मुक्त केले गेले आणि जागतिक भागीदारीमध्ये भारताची विश्वासार्हता वाढली. युरोपीय महासंघानंतर अमेरिकेसोबत करार शक्य झाला. भारताची तिसरी ताकद म्हणजे त्याची मजबूत, स्थिर आणि वाढणारी देशांतर्गत अर्थव्यवस्था.



आर्थिक सर्वेक्षणानुसार भारताच्या अर्थव्यवस्थेचे मूलभूत घटक पूर्वीपेक्षा अधिक मजबूत आहेत. त्यात ऐतिहासिकदृष्ट्या कमी महागाई, मजबूत ताळेबंद आणि सार्वजनिक गुंतवणूक यांचा समावेश आहे. सर्वेक्षणात भारताची मध्यम मुदतीची वाढ क्षमता सुमारे सात टक्के असण्याचा अंदाज आहे. आर्थिक वर्ष २०२७ साठी वाढीचा दर ६.८–७.२ टक्के असेल. ही परिस्थिती भारतासाठी एक प्रमुख ताकद म्हणूनदेखील उदयास आली आहे. लोकशाही स्थिरता आणि मजबूत राजकीय नेतृत्वभारताची चौथी ताकद म्हणजे लोकशाही स्थिरता आणि मजबूत राजकीय नेतृत्व. मोदी यांनी सलग तिसऱ्या टर्मसाठी पंतप्रधान म्हणून काम केले आहे. त्यांना जागतिक स्तरावर एक मजबूत राजकारणी म्हणून ओळखले जाते. भू–राजकीय गोंधळाच्या काळात, भारताची लोकशाही प्रक्रिया, कायद्याचे राज्य आणि पंतप्रधानांच्या सक्षम नेतृत्वाने भारताची एक वेगळी प्रतिमा निर्माण करण्यास मदत केली आहे; शिवाय 'इंडो–पॅसिफिक' प्रदेशात चीनच्या प्रभावाचा सामना करण्यासाठी अमेरिका भारताला एक अविभाज्य भागीदार मानते. एक मजबूत, आर्थिकदृष्ट्या समृद्ध आणि धोरणात्मकदृष्ट्या स्वतंत्र भारत हा अमेरिकेच्या जागतिक धोरणासाठी एक नैसर्गिक आणि अत्यंत मौल्यवान मित्र आहे. भारत हा राजकीयदृष्ट्या स्थिर लोकशाही देश आहे. भारत ही जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. भारताच्या डिजिटल क्रांतीने जगाला आश्चर्यचकित केले आहे. तो एक विश्वासार्ह भागीदार आहे, शिवाय आर्थिक महासत्ता बनण्याच्या मार्गावर आहोत.

युरोपीय महासंघानंतर अमेरिकेचे भारताकडे पडणारे पाऊल हा केवळ व्यापार करार नाही, तर भारताच्या बदलत्या जागतिक स्थितीचे प्रतीक आहे. भारताची वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था, विशाल बाजारपेठ, धोरणात्मक विचारसरणी आणि विश्वासार्ह धोरणे या सर्वांमुळे भारत जगातील पसंतीचा व्यापारी भागीदार बनला आहे. जागतिक अशांततेच्या काळात भारताने स्वतःला केवळ एक उत्तम पर्याय म्हणून सिद्ध केले नाही, तर अनेक प्रकारे एक विश्वासार्ह भागीदार म्हणूनही उदयास आला. याचा भारतीय अर्थव्यवस्थेला फायदा होईल आणि भारताच्या विकासाला गती मिळेल. अमेरिकेच्या व्यापार शुल्कातली सवलत भारतातील अनेक निर्यात–केंद्रित क्षेत्रांसाठी फायदेशीर आहे. भारतीय निर्यातदार, विशेषतः कापड, सीफूड, ऑटो न्सिलरी, रसायने आणि निवडक ग्राहक कंपन्यांना लक्षणीय फायदा होण्याची अपेक्षा आहे. ट्रम्प यांच्या अचानक घोषणेमागे अनेक धोरणात्मक आणि आर्थिक कारणे आहेत. ट्रम्प स्वतःला 'जागतिक डीलमेकर' म्हणून स्थान देऊ इच्छितात. भारतासारख्या वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेसोबतचा एक मोठा व्यापार करार त्यांच्यासाठी राजकीय आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर आहे. युरोपीय महासंघासोबतच्या करारामुळे अमेरिकेवर स्पर्धात्मक अटींवर भारताशी वाटाघाटी करण्यासाठी दबाव वाढला आहे. त्यामुळे अमेरिकन कंपन्या मागे राहणार नाहीत याची खात्री होईल. परिणामी, भारतासोबतच्या नवीन करारामुळे अमेरिकेची निर्यात वाढेल. हा करार दोन्ही देशांमधील संबंधांसाठी एक महत्त्वाचा टप्पा आहे.

**अमेरिकेने व्यापार कराराची घोषणा करताना भारताने रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणे थांबवण्याचे आश्वासन दिले आणि पाचशे अब्ज डॉलरच्या वस्तू आयात करण्याचे मान्य केले असा ट्रंप यांचा दावा आहे. या करारामुळे परदेशी गुंतवणूकदारांचा भारतावरील विश्वास वाढणार असून निर्यातीलाही चालना मिळणार आहे. दक्षिण आशियातील अन्य देशांच्या तुलनेत भारताच्या निर्यातीला जास्त संधी मिळू शकणार आहे.**

सध्या अमेरिका भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. २०२४ मध्ये दोन्ही देशांमधील एकूण व्यापार अंदाजे २१२ अब्ज डॉलर्स होता. भारताने अंदाजे १३० अब्ज डॉलर्स किमतीच्या वस्तू आणि सेवा निर्यात केल्या. त्यामुळे ४५ अब्ज डॉलर्सचा व्यापार अधिशेष निर्माण झाला. याचा अर्थ असा, की भारताची आयात त्याच्या एकूण निर्यातीपेक्षा ४५ अब्ज डॉलर्स कमी होती. व्यापार करारानंतर दोन्ही देशांमधील व्यापारात लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. कर आकारणीच्या दृष्टिकोनातून हा कर दर स्पर्धक देशांपेक्षा लक्षणीयरीत्या कमी आहे. अमेरिकेने इंडोनेशियावर १९ टक्के, व्हिएतनामवर २० टक्के, बांगलादेशवर २० टक्के तर चीनवर ३४ टक्के कर लादला आहे. भारत आणि अमेरिका यांच्यातील हा करार एक मोठी कामगिरी आहे. भारतावरील शुल्क कमी झाल्यामुळे चीन, पाकिस्तान आणि बांगलादेशची झोप उडणार आहे. अमेरिकेसोबतचा हा करार विकसनशील देशांसाठी, विशेषतः 'ग्लोबल साउथ'साठी एक मोठी कामगिरी आहे. भारत हा 'ग्लोबल साउथ'चा एक आवाज आहे. यामुळे अनेक देशांना भारताप्रमाणेच अमेरिकेशी व्यवहार करण्यासही प्रोत्साहन मिळेल. दबावापुढे झुकण्याऐवजी ते अमेरिकेशी वाटाघाटी करतील. 'ग्लोबल साउथ' ही एक भौगोलिक, आर्थिक आणि राजकीय संकल्पना आहे. ती प्रामुख्याने विकसनशील, कमी विकसित किंवा उदयोन्मुख देशांना सूचित करते. त्यात बहुतेकदा दक्षिण गोलार्धात स्थित देशांचा समावेश आहे. तथापि, ते केवळ भूगोलावर नाही, तर सामाजिक–आर्थिक स्थितीवर आधारित आहे. हे देश शोषण, गरिबी, असमानता आणि जागतिक संस्थांमध्ये कमी प्रतिनिधित्वाशी झुंजत आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या व्यापार आणि विकास परिषदेनुसार 'ग्लोबल साउथ'मध्ये आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन, आशिया (इस्रायल, जपान आणि दक्षिण कोरिया वगळता) आणि ओशनिया (ऑस्ट्रेलिया आणि न्यूझीलंड वगळता) मधील बहुतेक देश समाविष्ट आहेत. प्रमुख देशांमध्ये भारत, चीन, ब्राझील, दक्षिण आफ्रिका, इंडोनेशिया, नायजेरिया, मेक्सिको, अर्जेंटिना, इजिप्त, केनिया, इथिओपिया, घाना, बांगलादेश, पाकिस्तान आणि व्हिएतनाम यांचा समावेश आहे. हे देश जगाच्या लोकसंख्येच्या अंदाजे ७५–८५ टक्के प्रतिनिधित्व करतात आणि जागतिक जीडीपीमध्ये त्यांचा वाटा वेगाने वाढत आहे. ट्रम्प यांनी ताज्या कराराचा संबंध रशिया–युक्रेन युद्धाशी जोडला आहे. भारताने रशियन तेल खरेदी करणे थांबवणे युद्ध संपण्यास मदत करेल. तथापि, भारताचे ऊर्जेच्या गरजा निश्चित करण्याचे दीर्घकालीन धोरण राष्ट्रीय हितसंबंधांवर आधारित आहे. या संदर्भात, ट्रम्प यांचा दावा सध्या एकतर्फी दिसतो.

नोंद
कैलास ठोळे,
अर्थतज्ज्ञ

✦✦✦

# केवळ उद्योगाभिमुख अर्थसंकल्प

केंद्रिय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी सलग नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर केला. सामान्य जनतेपासून उद्योगजगतापर्यंत सर्वांच्या कोणत्याही अर्थसंकल्पाकडून काही अपेक्षा असतात. त्या या अर्थसंकल्पातून पूर्ण झाल्या का, हे तपासणे हेच विश्लेषकाचे काम असते. या अर्थसंकल्पाकडे पाहताना तो सामान्य काळातला आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. म्हणजे सध्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने देशात कोणतीही असामान्य परिस्थिती नाही. उद्योगजगतात असलेली असामान्य परिस्थिती मुख्यतः आंतरराष्ट्रीय पातळीवर, विशेषतः अमेरिकेने वाढवलेल्या टेरिफमुळे आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पाकडून आपल्या अपेक्षाही तशाच असायला हव्यात. पण खेदाने म्हणावे लागते, की त्या अपेक्षाही या अर्थसंकल्पाने पूर्ण केलेल्या नाहीत.

अर्थसंकल्पाचे विश्लेषण करताना काही चांगल्या बाबी आढळल्या. त्या आपण आधी पाहू. पहिली बाब म्हणजे सरकारने शेअर बाजारातील फ्युचर्स अँड ऑप्शन्स या प्रकारावर (शेअर बाजारातली सट्टेबाजी) असलेला 'सिक्युरिटी ट्रांझॅक्शन टॅक्स' हा कर काहीसा वाढवला आहे. फ्युचर्समध्ये तो ०.०२ टक्क्यांवरुन ०.०५ टक्क्यांपर्यंत वाढवला आहे, तर ऑप्शन्स प्रिमियममध्ये तो ०.१ टक्क्यांवरुन ०.१५ टक्क्यांवर नेला आहे. ही वाढ अगदीच थोडी असली तरी ही एक चांगली तरतूद आहे. देशातील संस्थांची आणि व्यक्तिगत बचत सट्टेबाजीमध्ये गुंतवण्यात उद्योगांचा कवा त्या व्यक्तीचा काहीही फायदा होत नाही. ही बचत उत्पादक कामांमध्ये गुंतवली जाण्यापेक्षा सट्ट्यामध्ये लावली जाण्यात सर्वांचेच नुकसान आहे. सिक्युरिटी ट्रांझॅक्शन टॅक्स वाढवल्यामुळे याला काही प्रमाणात आळा बसू शकेल आणि त्याचबरोबर करवाढीमुळे सरकारच्या उत्पन्नातही वाढ होऊ शकेल. अर्थात हा कर आणखी वाढवायला हवा होता, पण त्यात थोडी तरी वाढ करून सरकारने चांगले पाऊल उचलले आहे. दुसरी चांगली बाब म्हणजे सरकारने देशभरात विविध संस्था सुरू करण्याचा चांगला निर्णय घेतला आहे. विद्यापिठांचे क्लस्टर तयार करणे, रेअर अर्थ कॉरिडॉर तयार करणे यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्यात आली आहे. सध्या रेअर अर्थ मेटल्सना (यात उद्योगांसाठी लागणाऱ्या १७ प्रकारच्या दुर्मिळ खनिजांचा समावेश होतो.) जगात मोठी मागणी आहे. ही खनिजे शोधण्यासाठी केलेल्या भरीव तरतुदीमुळे भारताचे यासंदर्भातील इतर देशांवरील अवलंबित्व कमी होऊ शकेल.

आणखी एक चांगली बाब म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्तेसारख्या 'क्रिएटिव्ह टॅलेंट्स'मध्ये या अर्थसंकल्पात विशेष गुंतवणूक करण्यात आली आहे. यापुढे सर्वच क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेचे महत्त्व वाढणार आहे. या क्षेत्रात रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार आहेत. काही शिक्षणसंस्थांमध्ये यासंदर्भात 'ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट सेंटर' सुरू करणे, पूर्वेकडील भागात 'इन्स्टिट्यूट ऑफ डिझाईन' सुरू करणे, त्याचबरोबर आणखी नव्या संस्था सुरू करण्याबद्दल अर्थसंकल्पात घोषणा करण्यात आल्या आहेत. या घोषणांचेही स्वागत करायला हवे. याशिवाय या अर्थसंकल्पात भांडवली खर्चातही वाढ करण्यात आली आहे. या वर्षी हा खर्च साडेबारा लाख कोटी रुपयांपर्यंत गेला आहे. हीदेखील स्वागतार्ह बाब आहे. या तरतुदी चांगल्या असल्या तरी इतर अनेक तरतुदींमधून सरकारचा वरिष्ठ वर्गीय दृष्टिकोन दिसून येतो. म्हणजे सरकारला सामान्य नागरिकांच्या समस्यांशी काही देणे घेणे नाही, असा याचा अर्थ होतो. सरकारने यापूर्वीच चार कामगार संहिता (लेबर कोड्स) मंजूर केल्या आहेत. त्यात सामाजिक सुरक्षा कायदा मंजूर करण्यात आला आहे, पण ही केवळ पोकळ घोषणा असल्याचे दिसते. कारण ही घोषणा करताना त्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूदही करायला हवी होती. परंतु अर्थसंकल्पात या निधीबद्दल कुठेच उल्लेख आढळून येत नाही. वास्तविक, यासाठी सरकार घसघशीत तरतूद करू शकत होते.







दुसरी बाब म्हणजे शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांसाठी करण्यात आलेली तरतूद. या तरतुदीमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. आंतरराष्ट्रीय मानकांनुसार कवा देशाच्या गरजेचा विचार करता ही तरतूद तुटपुंजी म्हणता येईल इतकी कमी आहे. राज्य आणि केंद्र सरकारांनी मिळून सार्वजनिक आरोग्यासाठी राष्ट्रीय सकल उत्पन्नाच्या (जीडीपी) केवळ १.३९ टक्के तरतूद केली आहे. त्यापैकी ०.२९ टक्के तरतूद केंद्र सरकारने तर १.१ टक्के तरतूद राज्य सरकारने केली आहे. दक्षिण आफ्रिका कवा चीनसारख्या देशांमध्येही ही तरतूद पाच ते सात टक्क्यांपर्यंत असते. आपल्याकडेही आंतरराष्ट्रीय मानकांनुसार ती किमान तीन टक्के असायला हवी होती. प्रत्यक्ष आकडेवारी पहायची तर मागच्या वेळी एकूण ९८ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यापैकी ९४ हजार कोटी रुपयांचाच वापर झाला. या वर्षी एक लाख चार हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ही वाढ फारच कमी आहे. त्यात चलनवाढीचा (इन्फ्लेशन) विचार केला तर ही वाढ नसून प्रत्यक्षात मागच्या वर्षीपेक्षाही कमी तरतूद करण्यात आली आहे, असे म्हणावे लागेल. तीच गोष्ट शिक्षणक्षेत्राबाबतही आहे. या अर्थसंकल्पात एकूण खर्च ५३ लाख कोटी इतका दाखवण्यात आला आहे. त्यापैकी केवळ २.६ टक्के एवढी रक्कमच शिक्षण क्षेत्रासाठी देण्यात आली आहे. मागच्या वर्षी या क्षेत्रासाठी २.५ टक्के देण्यात आले होते. ही रक्कमही जागतिक मानकांनुसार फारच कमी आहे. शिवाय त्यातही चलनवाढीचा विचार केला तर ही तरतूदही अगदीच कमी वाटते.



**ताज्या अर्थसंकल्पात चांगल्या तरतुदींचे प्रमाण कमी असून सार्वजनिक आरोग्य, शिक्षण आणि रोजगार या क्षेत्रांसाठी फारसे काही नाही. विशेषत: रोजगार, सामान्यजनांची क्रयशक्ती वाढवणे यावर अर्थसंकल्पात भर दिला गेला नसल्याचे दिसते. शिवाय गेल्या वर्षी केलेल्या घोषणांच्या अंमलबजावणीप्रतीही सरकार प्रामाणिक नसल्याचे दिसून येते. त्यामुळे हा अर्थसंकल्प केवळ उद्योगांसाठीच आहे की काय अशी शंका येते.**

या सरकारला महात्मा गांधींच्या नावाचेच वावडे आहे. त्यामुळे त्यांनी 'मनरेगा' या योजनेचे नाव तर कचऱ्यात टाकलेच, पण त्यात काही चुकीचे बदलही केले. एवढेच नव्हे तर या वर्षी या योजनेसाठी केलेली तरतूदही (९५ हजार कोटी रुपयांची) मागच्या वर्षीपेक्षा बरीच कमी आहे. म्हणजे आरोग्य शिक्षण आणि रोजगार या तीनही क्षेत्रांसाठी सरकारने काहीच केलेले दिसत नाही. देशात युवकांच्या बेरोजगारीचे प्रमाण इतर वयोगटांशी तुलना करता तिप्पट आहे. पण युवकांच्या बेरोजगारीसाठी फारसे काही केलेले दिसत नाही. 'आयटी आणि हायटेक डेव्हलपमेंट'साठी तरतुदी केल्या असल्या तरी त्याचा सर्वच युवकांना फायदा होत नाही. उत्पादनक्षेत्रात रोजगार वाढावा यासाठी काहीच तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे 'मनरेगा' सारखी एखादी रोजगार हमी योजना शहरी युवकांसाठीही आणणे गरजेचे आहे. पण सरकार तसे करत नाही. विशेष म्हणजे या वर्षी ते शक्य होते, कारण सरकारकडे तरतूद करण्यासाठीचा पैसा आहे. पण त्यांच्या 'विकसित भारत' संकल्पनेत बेरोजगारी दूर करणे काही बसत नाही, असे वाटते.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे सरकारने मागच्या वर्षी केलेल्या घोषणांच्या अंमलबजावणीचाही एक अहवाल असतो. त्यात मागच्या वर्षी केलेल्या घोषणांची किती अंमलबजावणी झाली याची माहिती मिळते. हा अहवाल पाहिला तर त्यात अनेक योजनांमध्ये प्रस्ताव तयार केले आहे, शिफारस आली आहे, इतपतच प्रगती झाल्याचे दिसते. सरकार लोकप्रिय घोषणा करते, परंतु त्या घोषणांचे पुढे काय झाले याचा कोणी पाठपुरावा करत नाही. अर्थसंकल्पातही 'इम्प्लिमेंटेशन ऑफ द प्रॉमिसेस' (वचनांची अंमलबजावणी) असा दस्तावेज (डॉक्युमेंट) असतो. कायद्याने ते बंधनकारक असते. त्यातही अंमलबजावणीच्या दृष्टीने सरकार काही करत नाही, हे दिसून येते. सरकार म्हणते, आम्ही मोठ्या कालावधीचा विचार करून योजना आखतो, पण तसा विचर केला तरी बाजारातील क्रयशक्ती वाढवायला हवी. त्यासाठी लोकांच्या हातात पैसा जायला हवा. त्यासाठी जाणीवपूर्वक रोजगार निर्माण केले गेले पाहिजेत. तसा सरकारचा विचार दिसत नाही. केवळ भांडवली गुंतवणूक वाढवणे म्हणजेच विकास, असे त्यांना वाटते. भांडवली गुंतवणुकीला विरोध नाही, पण लोकांची क्रयशक्ती वाढवणे अधिक महत्त्वाचे वाटते. लोकांची क्रयशक्ती वाढण्यासाठी रोजगार उपलब्ध व्हायला हवेत. असे न झाल्यामुळे एकूणच हा अर्थसंकल्प केवळ उद्योगाभिमुख असल्याचे मत बनते.

दखल
अजित अभ्यंकर,
राजकीय विश्लेषक

✦✦✦

# आत्मनिर्भरतेतून उल्लेखनीय यश

**संगणकप्रणाली निर्यात आणि सेवाक्षेत्रात अग्रेसर भारतीय ‘झोहो’ ही भारतीय बहुराष्ट्रीय कंपनी सध्या बरीच चर्चेत आहे. व्यवसायासाठी आवश्यक आणि वेबवर चालणारी टूल्स आणि सॉफ्टवेअर्स विकसित करणाऱ्या या कंपनीने अनेक यशस्वी बहुराष्ट्रीय सॉफ्टवेअर उद्योगांपुढे मोठे आव्हान उभे केले आहे. तिची ४५ हून अधिक ॲप्स वेब, डेस्कटॉप तसेच मोबाईलवर सहज वापरता येतात. सध्या तिचा बराच बोलबाला आहे. त्या निमित्ताने...**

तंत्रवेध
मधुरा कुलकर्णी

‘वसुधैव कुटुंबकम’ ही भारताची संस्कृती असून भारताच्या कामगिरीचा प्रभाव सध्या संपूर्ण जगावर पडत आहे. जगाच्या कल्याणासाठी भारताचे मोठे योगदान आहे. १२ मे २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ‘आत्मनिर्भर भारत’ अभियानाची हाक दिली, स्वावलंबी भारत अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, एकविसाव्या शतकातील तंत्रज्ञानाद्वारे चालवलेल्या व्यवस्थांवर आधारित पद्धत, व्हायब्रंट डेमोग्राफी (युवा सामर्थ्य) आणि मागणी या पाच स्तंभांवर उभा असेल. त्याद्वारे आमच्या मागणी आणि पुरवठा साखळीची ताकद संपूर्ण क्षमतेसाठी वापरली जावी. सध्याच्या वैश्विकरणाच्या जमान्यात अर्थातच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय अशी कप्पेबंदी करता येणार नाही. जागतिक पुरवठा साखळीत आपल्याला महत्त्वाची भूमिका निभावता येईल. पूर्वी आपण अनेक गोष्टींसाठी दुसऱ्या देशांवर अवलंबून होतो. उदाहरणार्थ, काही खेळणी, इलेक्ट्रॉनिक वस्तू किंवा अगदी काही औषधंसुद्धा बाहेरून मागवावी लागत होती. पण कोरोनासारखे संकट आले, तेव्हा लक्षात आले की, आपण दुसऱ्यांवर अवलंबून राहिलो, तर अडचणीच्या वेळी आपल्याला मदत मिळणार नाही. म्हणूनच ‘आत्मनिर्भर’ होणे खूप महत्त्वाचे आहे. हेच अनेक प्रकारे संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर)बद्दलही म्हणता येईल. आपण संगणक प्रणाली निर्यात आणि सेवा क्षेत्रात अग्रेसर असलो तरी हाताच्या बोटावर मोजण्याइतके संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर प्रोडक्ट) विकसन पूर्णपणे भारतात झाले आहे. आता हे चित्र नक्कीच बदलले आहे आणि याला कारण आहे ‘झोहो’. झोहोने अनेक यशस्वी बहुराष्ट्रीय सॉफ्टवेअर उद्योगांपुढे आव्हान उभे केले आहे. झोहो ही एक भारतीय बहुराष्ट्रीय कंपनी असून व्यवसायासाठी आवश्यक असणारी वेबवर चालणारी टूल्स आणि सॉफ्टवेअर विकसित करते.

बहुचर्चीत ‘झोहो वन’ या पॅकेजद्वारे ४५ हून अधिक ॲप्स मिळतात. या पॅकेजमुळे सीआरएम, मार्केटिंग, अकाउंटिंग, एचआर, प्रोजेक्ट मॅनेजमेंट आणि इतर आवश्यक कार्ये एका ठिकाणी करणे शक्य होते. हे ॲप वेब, डेस्कटॉप आणि मोबाईलवर सहज वापरता येते. चेन्नई शहरातील एका छोट्या अपार्टमेंटमधून सुरुवात करून यशस्वी झालेली ‘झोहो’ ही एक कंपनी आहे. ही कंपनी वेब-आधारित बिझनेस टूल्स (व्यवसाय साधने) पुरवणारी एक अग्रणी कंपनी म्हणून उदयाला आली आहे. व्यवसायाचे संपूर्ण कामकाज क्लाउडवरून चालवण्यासाठी लागणारी सर्व प्रमुख ॲप्लिकेशन्स ती एकाच क्लाउड प्लॅटफॉर्मवर पुरवते. झोहोची स्थापना श्रीधर वेम्बू यांनी केली. या कंपनीची नोंदणी अमेरिकेतील न्यू जर्सी येथे ‘डव्हेंटनेट इंक’ या नावाने झाली. श्रीधर वेम्बू यांनी आयआयटी मद्रासमधून पदवी आणि अमेरिकेतून पीएचडी पूर्ण केल्यानंतर हा व्यवसाय सुरू केला होता. झोहोने २००५ मध्ये झोहो कस्टमर रिलेशनशिप मॅनेजमेंट प्लॅटफॉर्मद्वारे आपला प्रवास सुरू केला आणि आता व्यवसायाच्या आणि एंटरप्राइजच्या सर्व विभागांमध्ये विस्तार केला आहे. कंपनीचे मुख्यालय कॅलिफोर्नियामध्ये आहे, तसेच तिची कार्यालये सिंगापूर, जपान, चीन आणि भारतामध्ये आहेत. कंपनी ‘झोहो वन’ नावाचे एंटरप्राइजस्तरीय सब्स्क्रिप्शन (सदस्यता) देखील देते. यामध्ये झोहोची ४० ॲप्लिकेशन्स समाविष्ट आहेत. यामुळे सुलभ व्यवसायासाठी एक ‘ऑपरेटिंग सिस्टीम’ तयार होते. जगभरातील १८० हून अधिक देशांमध्ये या प्लॅटफॉर्मचे ५० दशलक्षाहून (५ कोटींहून) अधिक वापरकर्ते आहेत.



‘इंजिनीअरिंगद्वारे मार्केटिंग’ हे झोहोचे अंतिम व्यवसाय मॉडेल आहे. यामुळे लोकांना सुरुवातीचे कोणतेही शुल्क न देता त्यांची ॲप्लिकेशन्स वापरण्याची संधी मिळते. तसेच ही कंपनी जाहिरातींद्वारे कमाई करत नाही. २०२४ पर्यंत कंपनीमध्ये १७,००० हून अधिक कर्मचारी असून ‘फोर्ब्स’च्या मार्च २०२५ च्या अहवालानुसार, झोहोने जाहीर केले की त्यांचे २०२४ या वर्षातील उत्पन्न १.५ अब्ज रुपये होते, जे अंदाजे १२,५२५ कोटी (बारा हजार पाचशे पंचवीस कोटी) रुपये इतके आहे. या यशस्वी व्यवसाय मॉडेलमागे केवळ त्यांच्या उत्पादनांची गुणवत्ता आहे. त्यांच्या ‘फ्रीमियम मॉडेल’मुळे सुरुवातीला विनामूल्य साइन-अप करण्याची परवानगी मिळते आणि त्यानंतर गरज असल्यास प्रीमियम अपग्रेड कार्यक्रमासाठी विशिष्ट शुल्क आकारले जाते. झोहो आपल्या नफ्याच्या सुमारे ५० टक्के रक्कम प्रथम नवीन प्रकल्पांमध्ये खर्च करण्यास किंवा पुन्हा गुंतवण्यास प्राधान्य देते. झोहोचा एकूण खर्च स्वाभाविकपणे कमी असतो, कारण कंपनीचा नेहमीच असा विचार असतो की उत्पादने स्वतः बोलली पाहिजेत (उत्पादनांनी स्वतःची जाहिरात केली पाहिजे) आणि त्यामुळे ती मार्केटिंगवर पाच टक्क्यांपेक्षा जास्त खर्च करणे टाळते. झोहोची सगळी ॲप्स अतिशय युजरफ्रेंडली आहेत. ट्युटोरियल्स आणि व्हिडिओ मार्गदर्शने असल्याने शिकणे सुलभ आहे. झोहो पाचशेपेक्षा अधिक लोकप्रिय ॲप्स, प्रोग्रॅम्सशी सहज जोडता येते. उदा. मायक्रोसॉफ्ट ३६५, गुगल वर्कप्लेस वगैरे.

झोहो वापरताना आपल्या व्यवसायासाठी आवश्यक डेटा कस्टम डॅशबोर्डमध्ये पाहता येतो, रिपोर्ट्स मिळतात. विक्री आणि मार्केटिंगसाठी ऑटोमेटेड टास्क्स, फॉलोअप्स, लीड स्कोअरिंग शक्य होते. झोहोची किंमत इतर मोठ्या कंपन्यांच्या तुलनेत कमी आहे आणि फ्री/ट्रायल प्लान सुद्धा उपलब्ध आहे. अँड्रॉइड आणि ॲपल आयओएससाठी कंपनीची सगळी प्रमुख ॲप्स उपलब्ध आहेत. झोहोची भविष्यातील योजना हे तंत्रज्ञान आणि व्यूहात्मक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाकांक्षी आणि नवोन्मेषी आहेत. या योजनांमध्ये एआय एजंट, आयओटी सक्षम सोल्यूशन्स, सिक्युरिटी, नो-कोड/लो-कोड डेव्हलपमेंट, जगभरातील विस्तार आणि दीर्घकालिक पायाभूत संशोधनाचा समावेश होतो. पारंपारिक मोठ्या जनरेटिव्ह एआय मॉडेल्सच्या तुलनेत झोहो विशिष्ट, छोटे आणि उद्योगकेंद्रित एआय एजंट तयार करत आहे. हे एजंट विविध बिझनेस टास्कसाठी वापरण्यात येतात. जसे, ऑटोमेटेड रिपोर्टिंग, सिक्युरिटी, आणि रियल-टाईम डिसिजन मेकिंग. कंपनीच्या झिया एआयच्या माध्यमातून विविध थर्ड-पार्टी ॲप्लिकेशन्सशी कनेक्टिव्हिटी आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स मिळवता येते. जगभर विस्तार व लोकल इनोव्हेशनच्या पातळीवर बोलायचे तर नवीन डेटा सेंटर्स, स्थानिक कार्यालये, संशोधन केंद्रे आणि स्थानिक समुदाय व विद्यापीठांशी कंपनी आणि उत्पादनांचे सहकार्य आहे. संयुक्त प्रोजेक्ट्स आणि स्थानिक भागीदारीचा विचार करता स्टार्टअप्स, शिक्षणसंस्था आणि आर अँड डी केंद्रात कंपनीतर्फे भागीदारीचे आयोजन शक्य होते.



ॲडव्हान्स्ड सिक्युरिटी आणि कंप्लायन्स टूल्सच्या अनुषंगाने विचार करता लोगो ३६० क्लाउड आणि इंटीग्रेटेड सिक्युरिटी सोल्यूशन एकत्रित करत डेटा प्रोटेक्शन आणि कंप्लायन्स मजबूत करते. भारतीय उद्योग आणि लघुद्योगांना झोहो वापरणे सोपे, किफायतशीर आणि सुरक्षित आहे. हे क्लाउडवर आधारित असल्याने कुठूनही वापरता येते. मोबाईल ॲप्ससह सहज प्रवेश मिळतो. भारतीय बाजाराच्या गरजेनुसार बनवलेले असल्याने लघुद्योगांसाठी स्वस्त आणि सोपे आहे. कंपनीच्या उत्पादनांवर सेव केला जाणारा सर्व डेटा भारतात सुरक्षित ठेवला जातो. त्यामुळे व्यवसाय डिजिटल करण्यासाठी ‘झोहो’ एक लक्षवेधी पर्याय ठरतो. झोहोची भुरळ पडल्याने अनेक प्रथितयश कंपन्या त्याचे वापरकर्ते झाले आहेत. भारताचे केंद्रीय माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी मायक्रोसॉफ्ट आणि गूगलच्या उत्पादनांऐवजी त्यांच्या कामासाठी झोहोच्या स्वदेशी उत्पादकता प्लॅटफॉर्मचा स्वीकार केला आहे. त्यांनी इतरांनाही भारतीय तंत्रज्ञान उत्पादने वापरण्याचे आवाहन केले आहे. पीयूष गोयल आणि धर्मेंद्र प्रधानसारख्या इतर केंद्रीय मंत्र्यांनीही झोहोच्या ‘अरात्ताई’ मेसेजिंग ॲपचा आणि इतर प्लॅटफॉर्मचा वापर सार्वजनिकरित्या स्वीकारला आहे. राजकारणी नव्हेच तर अनेक उद्योगही झोहो वापरतात. भारतातील सर्वात मोठ्या स्टॉक ब्रोकरेज प्लॅटफॉर्मपैकी एक असलेल्या झेरोधानेही आपल्यासाठी आणि ग्राहक व्यवस्थापनासाठी झोहोच्या प्लॅटफॉर्मचा वापर केला आहे. ✦✦✦

# सामरिक शह देण्यासाठी...

**भारत आणि चीन यांच्यातील संबंध अमेरिकेमुळे सध्या चांगले झाले असले, तरी चीनवर विश्वास ठेवता येत नाही. त्यामुळे भारताला कायम सावध राहावे लागेल. भारताने त्या दृष्टीने पावले उचलायला सुरुवात करत भूतानमध्ये चार हजार कोटी रुपये खर्चून दोन रेल्वेमार्ग बांधण्याची घोषणा केली आहे. हे केवळ रेल्वेमार्ग नाहीत, तर त्यातून संरक्षण यंत्रणा वेगाने धावू लागेल. या प्रकल्पांचा हा खास मागोवा.**

विशेष
प्रा. मुक्ता पुरंदरे

भारत आणि चीनमधील सीमा तणावाच्या पार्श्वभूमीवर, भारताने भूतानमध्ये दोन रेल्वेमार्गांची घोषणा केली आहे. या रेल्वे प्रकल्पांमुळे भारत आणि भूतानमधील व्यापार वाढेल. त्यामुळे भूतानमधील वस्तू रेल्वेने बंदरांपर्यंत पोहोचवणे सोपे होईल; पण ही साधी बाब नाही. त्यामागे एक मोठी भारतीय रणनीती आहे. भारत सरकारच्या या पावलामुळे भारतीय लष्कराच्या धोरणात्मक क्षमताच बळकट होणार नाहीत, तर सीमेवर चीनच्या बाजूने एकतर्फी झुकलेल्या धोरणात्मक संतुलनातही बदल होईल. पहिली रेल्वे आसाममधील कोक्राझार ते भूतानमधील गेव्हेलफुगपर्यंत धावेल, तर दुसरी रेल्वे बोंगाईगाव ते भूतानमधील समद्रुप जोंगखारपर्यंत जाईल. दोन्ही मार्ग दक्षिण भूतानला भारताच्या रेल्वे नेटवर्कशी जोडतील. चीनची सीमा तुलनेने जवळ आहे, म्हणून संरक्षणात्मक दृष्टिकोनातून ही कनेक्टिव्हिटी महत्त्वाची मानली जाते. भूतानच्या सुरक्षेची जबाबदारी भारत घेत असल्याने भारताने तेथे आपली लष्करी उपस्थिती मजबूत करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. सध्याची परिस्थिती अशी आहे, की भूतानसह देशाच्या सीमावर्ती भागात रस्त्याने सैन्य आणि जड शस्त्रे वाहून नेण्यासाठी अनेक दिवस लागतात. अनेक ठिकाणी रस्तेच नाहीत किंवा असले तरी अत्यंत अरुंद आहेत. त्यामुळे मोठे लष्करी ट्रक किंवा शस्त्रे उंचावर पोहोचू शकत नाहीत. आता, भूतानच्या दुर्गम भागात भारताने रेल्वे लाईन टाकण्याचा निर्णय घेतल्याने भारतीय सैनिक, टँक, चिलखती वाहने आणि तोफखाना खूप कमी वेळेत घटनास्थळी पोहोचवता येतील. युद्धकाळात वेळेची बचत अनेकदा महत्त्वाची ठरू शकते. धोकादायक टँक आणि तोफखाना जलद तैनात करता येऊ शकतो.

लष्कराला सामान्य परिस्थितीतही भूतानसह उंचावर असलेल्या भागात दारूगोळा, इंधन आणि रेशन यासारख्या रसद साहित्याची वाहतूक करण्यात अडचणी येतात. रेल्वेच्या बांधकामामुळे जलद गतीने मोठ्या प्रमाणात पुरवठा करण्यासाठी वाहतूक करणे शक्य होईल. उदाहरणार्थ, जिथे पूर्वी डझनभर ट्रकची आवश्यकता होती, तिथे आता एक ट्रेन तीच कामे करू शकेल. या रेल्वेमार्गांद्वारे भारत आपले मुख्य युद्ध रणगाडे (टी-९० आणि अर्जुन), तोफखाना तोफा (के-९ वज्र आणि बोफोर्स), क्षेपणास्त्र प्रक्षेपक आणि हवाई संरक्षण प्रणाली भूतान-चीन सीमेवरदेखील वाहून नेऊ शकेल. यामुळे कोणत्याही अचानक हल्ल्याच्या बाबतीत चीनला जलद प्रत्युत्तर देता येईल. सिलिगुडी कॉरिडॉरची सुरक्षा मजबूत केली जाईल. ही रेल्वे कनेक्टिव्हिटी भारताला हवाई मार्गांवर पूर्णपणे अवलंबून राहण्यापासून रोखेल. हवाई पुरवठा जलद असला तरी महाग आणि हवामानावर अवलंबून असतो. रेल्वे केवळ किफायतशीरच नाही तर एक विश्वासार्ह पुरवठा साखळीदेखील तयार करेल. हे रेल्वे नेटवर्क सिलिगुडी कॉरिडॉर (चिकन्स नेक) ची सुरक्षादेखील मजबूत करेल. हा अरुंद मार्ग भारताच्या ईशान्येकडील राज्यांना उर्वरित भारताशी जोडतो. चीनने हा कॉरिडॉर तोडण्याची धमकी दिल्यास भारत या रेल्वेमार्गांचा वापर करून जलदगतीने सैन्य आणि शस्त्रे तैनात करू शकेल. या रेल्वे मार्गांमुळे केवळ लष्करी दृष्टिकोनातूनच नव्हे, तर भारत आणि भूतानमधील आर्थिक आणि राजनैतिक संबंध दृढ होतील. यामुळे दोन्ही देशांमधील परस्परविश्वास वाढेल आणि चीनच्या विस्तारवादी रणनीतीला आळा बसेल.






भूतानमध्ये टाकण्यात येणाऱ्या दोन लोहमार्गांमुळे केवळ सैन्य आणि शस्त्रास्त्रांची जलद हालचाल सुलभ होणार नाही, तर या प्रदेशात भारताची धोरणात्मक स्थितीदेखील निर्णायकपणे मजबूत होईल. हे लक्षात घेतले पाहिजे, की भूतानमध्ये भारताची उपस्थिती चीनसाठी नेहमीच एक संवेदनशील मुद्दा राहिला आहे. भूतानचे रक्षण करण्याच्या भारताच्या वारंवार प्रयत्नांबद्दल तो नेहमीच चिंतेत राहिला आहे. २०१७ मध्ये चीनी सैन्याने डोकलाम ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला, तेव्हा भूतानच्या वतीने चीनला आव्हान देणारे भारतीय सैन्य होते. भविष्यात पुन्हा असे तणाव निर्माण झाल्यास रेल्वेने जलद गतीने सैन्याला सीमेवर पोहोचवणे खूप सोपे होईल. देशाच्या संरक्षण व्यवस्थांमध्येही बुद्धिबळाचा आधार घेतला जात असतो. शत्रूपक्ष कुठले प्यादे कधी हलवेल आणि त्याला कसे मारायचे, याची व्यूहनीती आखली जात असते. त्याला ‘स्ट्रॅटेजिक’ व्यूहनीती म्हटले जाते. भूतानमध्ये सध्या कोणतीही रेल्वेलाईन नाही. आता भारत भूतानला रेल्वेने जोडणार आहे. त्यावर अंदाजे चार हजार कोटी रुपये खर्च केले जातील. इतक्या वर्षांनंतर हे का घडत आहे आणि त्याचा अर्थ आणि उद्देश काय आहे हे समजून घेतले पाहिजे. या रेल्वे लाईन्स कुठे बांधल्या जातील ते पाहेलि पाहिजे. भूतान आणि भारताची सीमा सुमारे ७०० किलोमीटर आहे. एका बाजूला, भूतानची भारताशी असलेली सीमा पश्चिमेला सिक्कीममध्ये सुरू होते; पण सिक्कीमची सीमा फक्त ३२ किलोमीटर आहे. त्यानंतर भूतानच्या खाली, म्हणजेच भूतानच्या दक्षिणेला पश्चिम बंगालचा दार्जिलिंग-सिलीगुडी परिसर आहे. पश्चिम बंगाल आणि भूतानची सीमा १८३ किलोमीटर आहे.

त्यानंतर, भूतानच्या अगदी खाली, म्हणजेच दक्षिणेला आसाम आहे. आसाम आणि भूतानची सीमा २६७ किलोमीटर आहे. त्यानंतर भूतानच्या पूर्वेला अरुणाचल प्रदेशचा तवांग परिसर आहे. भूतानची अरुणाचल प्रदेशशी असलेली सीमा २१७ किलोमीटर आहे. याचा अर्थ असा, की भूतान तीन बाजूंनी भारताने वेढला आहे. पश्चिमेला सिक्कीम, दक्षिणेला पश्चिम बंगाल आणि आसाम आणि पूर्वेला अरुणाचल. उत्तरेला तिबेट आहे. म्हणजेच चीन. भूतानच्या पश्चिमेला संपूर्ण सीमा सिक्कीमशी नाही. ती फक्त ३२ किलोमीटर आहे. सिक्कीम आणि भूतानमध्येदेखील तिबेट किंवा चीनचे एक खोरे आहे. त्याला चुम्बी खोरे म्हणतात. भूतान आणि सिक्कीममध्ये खंजिराच्या आकारासारखे हे चुम्बी खोरे आहे. या खंजिराच्या अगदी दक्षिण टोकावर आहे डोकलाम. पहिली रेल्वेलाईन आसाममधील कोक्राझार ते भूतानमधील गेलेफूपर्यंत बांधली जात आहे. ही सुमारे ७० किलोमीटरची लाईन असेल. त्यावर सहा नवीन स्टेशन्स बांधली जातील आणि त्यासाठी अंदाजे साडेतीन हजार कोटी रुपये खर्च येईल, कारण त्यासाठी असंख्य पूल बांधावे लागतील. पर्वतांमध्ये रेल्वेमार्ग बांधणे हे मैदानी भागात रेल्वेमार्ग बांधण्यापेक्षा पूर्णपणे वेगळे असते. ती अभियांत्रिकीही गुंतागुंतीची असते. त्याची तुलना मैदानी भागातील रेल्वेमार्गाशी करता येत नाही. भूतानला जाणारी रेल्वेलाईन हा केवळ एक प्रकल्प नाही, तर दोन देशांना जोडणारा महापयोगी उपक्रम आहे. दुसरी मार्गिका पश्चिम बंगालमधील बनारहाट ते भूतानमधील समत्सेपर्यंत धावेल. ती फक्त २० किलोमीटर आहे; पण हे २० आणि ७० किलोमीटरचे रेल्वेमार्ग भूतानला भारताच्या ७० हजार किलोमीटरच्या रेल्वेमार्गांशी जोडतील.

आसाममधील कोक्राझार आणि पश्चिम बंगालमधील बनारहाट हे आधीच रेल्वे नेटवर्कचा भाग आहेत. भारत भूतानमध्ये उत्पादित होणाऱ्या गोष्टींपैकी ८० टक्क्यांपेक्षा जास्त वस्तू खरेदी करतो. सध्या सर्व माल ट्रकने येतो. ट्रकना डोंगराळ रस्त्यांवरून जाण्यात अडचणी येतात आणि वाहने अनेकदा त्या रस्त्यांवर अडकतात. चीनने या वर्षी चुंबी खोऱ्यापर्यंत रेल्वे मार्ग टाकण्यास सुरुवात केली आहे. चीन संपूर्ण तिबेटमध्ये रेल्वेलाईन बांधत आहे; परंतु या भागातील एक उल्लेखनीय मुद्दा म्हणजे त्याची चुम्बी खोऱ्यातील यातुंगपर्यंत विस्तारण्याची योजना आहे. या पलीकडे भूतानमध्ये असलेला डोकलाम आहे. भारताचा भूतानशी संरक्षणात्मक करार आहे. भूतानचा बचाव हा संरक्षणाचा विषय असल्याने भारतीय सैन्य लढण्यासाठी भूतानच्या बाजूने उतरेल. चीनने डोकलाममध्ये आपले सैन्य पाठवले, तेव्हा भारतीय सैन्य लढण्यासाठी आले. हा फक्त भूतानच्या भूभागाचे रक्षण करण्याचा विषय नाही. या भागाजवळ भारताचा सिलिगुडी कॉरिडॉर आहे. हा कॉरिडॉर एका ठिकाणी फक्त २२ किलोमीटर रुंद आहे आणि दक्षिणेला त्याच्या खालच्या बाजुला बांगलादेश आहे. म्हणून जवळच्या परिसरात चीनी सैन्याची उपस्थिती भारतासाठी नेहमीच आव्हानात्मक असेल. त्या अरुंद कॉरिडॉरद्वारे संपूर्ण प्रदेश भारताच्या उर्वरित भागाशी जोडलेला आहे. म्हणूनच डोकलामवरील चीनचा दावा भूतानसाठीच नाही, तर भारतासाठीही एक मोठे आव्हान आहे. या आणि अशा अनेक आव्हानांना पेलण्यासाठी भारताने आखलेले रेल्वेमार्ग महत्वाची भूमिका बजावणार आहेत. ✦✦✦

# ७६ वर्षानंतरही इंग्रजीच प्रशासकीय भाषा का आहे?

जेव्हा संविधान सभेचे सदस्य संविधानाच्या अधिकृत इंग्रजी मजकुरावर स्वाक्षरी करत होते, तेव्हा अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी सभागृहासमोर त्याचे हिंदी भाषांतरही सादर केले आणि सदस्यांना त्यावरही स्वाक्षरी करण्याची विनंती केली. हे पाऊल संविधान सभेमध्ये उठलेल्या त्या प्रबळ मागणीने प्रेरित होते की, संविधान कोणत्याही वसाहतवादी भाषेत नसून जनतेच्या भाषेत असायला हवे.

हा क्षण एका व्यापक घटनात्मक महत्त्वाकांक्षेला दर्शवत होता, जी भारताच्या अनेक प्रादेशिक भाषांचा सन्मान करत होती, विविधता स्वीकारत होती आणि इंग्रजीवरील वसाहतवादी भाषिक अवलंबित्व हळूहळू संपवण्याची संकल्पना मांडत होती.

हिंदीला या दिशेने एक सुरुवात मानले गेले होते, या ध्येयाचे ते एकमेव रूप नव्हते. हिंदीची कल्पना राजभाषा म्हणून केली गेली होती, परंतु इतर भारतीय भाषांच्या निरंतर वापरासाठी आणि विकासासाठी स्पष्ट सुरक्षा उपायदेही करण्यात आले होते.

आठव्या अनुसूचीने चौदा प्रादेशिक भाषांना घटनात्मक मान्यता दिली; अनुच्छेद ३४५ ने राज्यांना अधिकार दिला की त्यांनी त्यांच्या शासकीय कायासांठी राज्यात बोलल्या जाणाऱ्या एक किंवा अधिक भाषांचा स्वीकार करावा; आणि अनुच्छेद ३४७ ने राष्ट्रपतींना अशी शक्ती दिली की ते राज्याच्या एका मोठ्या लोकसंख्येने बोलल्या जाणाऱ्या भाषेला अधिकृत मान्यता देऊ शकतील. राज्य विधानसभांचे कामकाज राज्याच्या राजभाषेत व्हायला हवे होते आणि संसदेतही सदस्यांना त्यांच्या मातृभाषेत बोलण्याची परवानगी देण्यात आली होती.

त्याचबरोबर, अनेक घटनात्मक कार्यांसाठी इंग्रजीला एक कार्यकारी भाषा म्हणून कायम ठेवले गेले. ती केंद्र सरकारची अधिकृत भाषा राहिली, हिंदीसोबत संसदेची एक डिफॉल्ट भाषा राहिली आणि सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालयांचे कामकाज, संसदेत सादर होणारी विधेयके आणि इतर वैधानिक दस्तऐवजांची भाषाही इंग्रजीच राहिली.

प्रत्यक्ष संविधानदेखील शेवटी इंग्रजीमध्येच स्वीकारले गेले - असा निर्णय, ज्याबद्दल अनेक सदस्यांनी खेद व्यक्त केला. इंग्रजी केवळ १५ वर्षांच्या कालावधीसाठीच राहील आणि त्यानंतर ती राजभाषा राहणार नाही, या आश्वासनाने त्यांचे समाधान करण्यात आले होते. ७६ वर्षानंतरही हे घटनात्मक वचन केवळ अंशतःच पूर्ण होऊ शकले आहे. इंग्रजीच्या पलीकडे जाण्याचा प्रत्येक गंभीर प्रयत्न एक तर थांबला किंवा कमकुवत झाला किंवा लांबणीवर टाकला गेला.




> जोपर्यंत घटनात्मक संस्था त्या भाषांमध्ये बोलणार नाहीत ज्यामध्ये नागरिक आपले जीवन जगतात, तोपर्यंत भाषिक लोकशाही हे एक अपूर्ण घटनात्मक वचनच राहील. न्यायालयांचे निकाल आजही प्रामुख्याने इंग्रजीतच दिले जातात.

काळानुसार इंग्रजी केवळ एक कार्यकारी भाषाच राहिली नाही, तर ती घटनात्मक सत्तेची भाषा बनली. उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय प्रामुख्याने इंग्रजीमध्येच कामकाज चालवतात; विधेयके आणि कायदे बहुतांश इंग्रजीमध्येच तयार केले जातात; आणि उच्चस्तरीय अधिकृत कामकाज जवळजवळ पूर्णपणे त्याच भाषेत चालते.

ही परिस्थिती कोणत्याही एका निर्णयाचा किंवा नियोजित योजनेचा परिणाम नव्हती. हे संस्थात्मक जडत्व आणि राजकीय सतर्कतेतून निर्माण झाले आहे. भाषिक बहुसंख्यावादाबाबतच्या खोल शंका, विशेषतः हिंदीच्या वर्चस्वाची भीती सुधारणेच्या प्रयत्नांना रोखत राहिली.

इंग्रजीकडे एक तटस्थ तडजोडीची भाषा म्हणून पाहिले जाऊ लागले, जी कोणत्याही एका भारतीय भाषेला विशेष अधिकार देत नव्हती. पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी इंग्रजीच्या जागी हिंदीला एकमेव राजभाषा बनवण्याचा प्रयत्न केला, तेव्हा विशेषतः मद्रासमध्ये मोठा विरोध झाला. दोन लोकांनी आत्मदहन केले, एकाने विषप्राशन केले आणि हिंदीच्या प्रतिमा जाळण्यात आल्या.

आज इंग्रजीने घटनात्मक सत्तेला भाषिक बहुसंख्याकांपासून वेगळे केले आहे आणि त्याच वेळी एका मर्यादित, शिक्षित उच्चभ्रू वर्गाची पकड मजबूत केली आहे.

भाषाच ठरवते की कायदा कोण वाचू शकतो, कोण तो समजू शकतो आणि कोण घटनात्मक संस्थांशी अर्थपूर्णरीत्या जोडू शकतो.

न्याय मिळणे हे केवळ न्यायालयांपर्यंत पोहोचण्याच्या अधिकारापुरते मर्यादित नाही; त्यामध्ये कामकाज, युक्तिवाद आणि निकाल समजून घेण्याच्या क्षमतेचाही समावेश आहे. असे संविधान, जे बहुतेक नागरिक वाचू शकत नाहीत किंवा वापरू शकत नाहीत, ते सहभागाचे माध्यम बनण्याऐवजी केवळ एक दस्तऐवज बनून राहते.

# शासन निर्णयातून वगळले गेलेले राष्ट्रपुरुष आणि अस्वस्थ करणारे वास्तव

**लो**कशाही ही केवळ निवडणुकांची प्रक्रिया नसून ती सामूहिक स्मृती, मूल्ये आणि परंपरा यांवर उभी असते. एखादा समाज कोणाला स्मरतो, कोणाला विसरतो आणि कोणाला जाणीवपूर्वक बाजूला सारतो, यावर त्या समाजाची वैचारिक दिशा ठरते.

याच पार्श्वभूमीवर २०२६ मध्ये राष्ट्रपुरुष, थोर व्यक्ती यांच्या जयंती-पुण्यतिथी व राष्ट्रीय दिन साजरे करण्याबाबत काढण्यात आलेल्या शासन निर्णयातून जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या जयंती-पुण्यतिथी वगळल्या गेल्याची बाब केवळ प्रशासकीय नव्हे, तर गंभीर वैचारिक प्रश्न उपस्थित करणारी ठरते.

हा निर्णय चुकून झाला आहे का? की तो एका ठराविक विचारसरणीचा सूचक आहे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीत योगदान देणाऱ्या नेत्यांना वगळणे हे कुठल्या भारताची कल्पना मांडते?

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज हे केवळ धार्मिक संत नव्हते; ते सामाजिक क्रांतिकारक व महाराष्ट्राच्या आत्म्याचे शिल्पकार होते. त्यांनी समाजाला भक्तीच्या नावाखाली पलायनवाद शिकवला नाही, तर समतेचा, विवेकाचा आणि मानवतेचा मार्ग दाखवला. ज्ञानेश्वरांनी अवघ्या तरुण वयात लिहिलेली ज्ञानेश्वरी ही ग्रंथरचना संस्कृतच्या मक्तेदारीला आव्हान देत मराठीला ज्ञानभाषा बनवणारी ठरली. विश्वचि माझे घर ही भूमिका मांडणारा हा संत आजही समावेशक भारताची संकल्पना सांगतो.

संत तुकाराम महाराजांनी अभंगातून अन्याय, दांभिकता आणि सामाजिक विषमतेवर प्रहार केला. जाति कुळ धर्म नाही उरला असे सांगणाऱ्या तुकारामांचे विचार आजही समाजातील भिंती तोडणारे आहेत. अशा संतांना शासन निर्णयातून वगळणे म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मुळांनाच दुय्यम ठरवण्यासारखे आहे.

## स्मृतींचे राजकारण

महाराष्ट्राची संतपरंपरा ही कर्मकांडप्रधान नव्हे, तर मानवकेंद्रित परंपरा आहे. संतपरंपरा म्हणजे श्रद्धा नव्हे, तर सामाजिक संविधान आहे. इथे देवापेक्षा माणूस महत्त्वाचा ठरतो. त्यामुळेच फुले-शाहू-आंबेडकर यांनी संतपरंपरेला सामाजिक परिवर्तनाचा पाया मानला. अशा परंपरेतील दोन प्रमुख स्तंभ, ज्ञानेश्वर आणि तुकाराम यांची जयंती-पुण्यतिथी शासनाच्या अधिकृत यादीतून वगळली जाणे म्हणजे समतेच्या विचारधारेला बाजूला सारण्याचा संकेत आहे का, असा प्रश्न निर्माण होतो.



प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

दुसरीकडे, माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी वगळली जाणेही तितकेच चिंताजनक आहे. राजीव गांधी हे कोणत्याही पक्षापुरते मर्यादित नेते नव्हते; ते आधुनिक भारताच्या तंत्रज्ञानात्मक आणि प्रशासकीय सुधारणांचे शिल्पकार होते.

पंचायतराज व्यवस्था, १८ वर्षांवरील मताधिकार, संगणकीकरण, दूरसंचार क्रांती, तरुणांना राजकारणात संधी, या सगळ्या गोष्टींनी भारताला २१व्या शतकात प्रवेश करण्यासाठी तयार केले. आज डिजिटल इंडियाची भाषा बोलताना, त्याचे मूळ रोवणाऱ्या नेतृत्वाला विसरणे हा इतिहासाशी केलेला अन्याय ठरतो. कोणत्या व्यक्तींच्या जयंती-पुण्यतिथी शासनस्तरावर साजऱ्या करायच्या, हा निर्णय केवळ प्रशासकीय सोयीचा नसतो. तो राज्याच्या वैचारिक भूमिकेचे प्रतिबिंब असतो. त्यामुळेच हा निर्णय ह्लतांत्रिकह्व म्हणून दुर्लक्षित करता येत नाही.

जर संतपरंपरा आणि आधुनिक राष्ट्रनिर्मितीतील नेत्यांना वगळले जात असेल, तर मग कोणत्या मूल्यांना प्राधान्य दिले जात आहे? हा प्रश्न उभा राहतो. शासन हे सर्वसमावेशक असते की निवडक स्मृतींवर उभे राहते, याची चाचणी अशाच निर्णयांतून होते.

इतिहास हा केवळ पुस्तकांत नसतो; तो स्मरणोत्सवांत, सार्वजनिक कार्यक्रमांत आणि सामूहिक साजरीकरणात जिवंत राहतो. ज्या क्षणी शासन पातळीवर एखाद्या व्यक्तीचे स्मरण थांबते, त्या क्षणी हळूहळू तिचे विचारही बाजूला पडण्याचा धोका निर्माण होतो.

संत तुकाराम-ज्ञानेश्वर किंवा राजीव गांधी यांना वगळणे म्हणजे फक्त नावांची कपात नव्हे, तर विचारांची कपात आहे. महाराष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिक राज्य नव्हे; तो संत-समता-सुधारणांचा प्रदेश आहे. जर याच परंपरेला शासन निर्णयातून दुय्यम स्थान दिले गेले, तर उद्या फुले, शाहू, आंबेडकर यांच्याबाबतही असेच होणार नाही, याची खात्री कोण देणार? हा प्रश्न भावनिक नसून राज्याच्या आत्म्याशी संबंधित आहे.

२०२६ च्या शासन निर्णयाने एक स्पष्ट गरज अधोरेखित केली आहे, इतिहास, संस्कृती आणि राष्ट्रनिर्मिती यांचा समतोल राखणारे निर्णय घेण्याची. कोणालाही वगळून, कुणाला प्राधान्य देऊन समाज एकसंध राहत नाही. संतपरंपरा आणि आधुनिक नेतृत्व हे विरोधी नाहीत; ते एकाच भारतीय प्रवासाचे वेगवेगळे टप्पे आहेत. त्यांना वेगळे करण्याचा प्रयत्न म्हणजे भारताच्या समावेशक आत्म्यालाच धक्का देणे होय.

शासनाने हा निर्णय पुनर्विचारात घ्यावा, ही केवळ मागणी नाही; ती लोकशाहीची अपेक्षा आहे. कारण राष्ट्र उभे राहते ते केवळ भविष्यातील स्वप्नांवर नाही, तर जपलेल्या स्मृतींवर. महाराष्ट्राची ओळख ही केवळ सत्तेच्या निर्णयांनी घडलेली नाही; ती संतांच्या अभंगांनी, विचारवंतांच्या लेखणीतून आणि राष्ट्रउभारणीत योगदान देणा?या नेत्यांच्या दूरदृष्टीतून घडलेली आहे. त्या स्मृती जपणे ही कोणाची मक्तेदारी नाही, तर शासनाची घटनात्मक आणि नैतिक जबाबदारी आहे.

जगतगुरू संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि राजीव गांधी यांची जयंती-पुण्यतिथी शासन निर्णयातून वगळणे हा केवळ प्रशासकीय बदल नसून, सामूहिक स्मृती पुसण्याचा धोकादायक प्रयत्न ठरू शकतो. आज जर हे स्वीकारले, तर उद्या कोणाचे नाव यादीतून गळेल याची शाश्वती कोण देणार?

शासनाने तात्काळ या निर्णयाचा पुनर्विचार करावा. स्मरणोत्सव ही औपचारिकता नाही; ती पिढ्यांना मूल्यांची ओळख करून देणारी शाळा असते. संतांचा विवेक, समाजसुधारकांचा मानवतावाद आणि आधुनिक राष्ट्रनिर्मात्यांची दूरदृष्टी, या तिन्ही प्रवाहांशिवाय महाराष्ट्र अपूर्ण आहे. आज गरज आहे ती विभाजनाच्या नव्हे, तर समावेशनाच्या निर्णयांची. सत्तेच्या बदलत्या समीकरणांपेक्षा समाजाच्या दीर्घकालीन आत्म्याला प्राधान्य देण्याची. कारण स्मृती जपणारेच राष्ट्र घडवतात; आणि स्मृती पुसणारे इतिहासाच्या कठड्यावर उभे राहतात. शासनाने हे लक्षात ठेवावे की, संत, राष्ट्रपुरुष आणि विचारवंत यांना वगळून नव्हे, तर त्यांना सन्मान देऊनच लोकशाही मजबूत होते.

## बांगलादेशातील निवडणुका आपल्यासाठीही महत्त्वाच्या

बांगलादेशमध्ये १२ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या निवडणुकांमध्ये तीन शक्ती सहभागी होत आहेत. पहिली- मुहम्मद युनूस यांचे अंतरिम सरकार. त्यास पाकिस्तानशी संबंधित इस्लामी गटांचा पाठिंबा आहे.

दुसरी- बीएनपी. त्याचे नेतृत्व गेल्या महिन्यात निधन झालेल्या खालिदा झिया यांचे पुत्र तारिक रहमान करत आहेत. तिसरी- बांगलादेशच्या अस्थिरतेत स्वतःचे हित साधणाऱ्या परदेशी शक्ती. यामध्ये चीन आणि पाकिस्तान भारतविरोधी घटकांना पाठिंबा देतात. त्यानंतर अमेरिका आहे. ती हसिना सरकारच्या जागी स्वतःला अनुकूल असलेले सरकार इच्छिते. वर्षानुवर्षे शेख हसिना सरकारने अमेरिकेला बंगालच्या उपसागरातील सेंट मार्टिन बेटावर प्रवेश करण्यापासून रोखले. म्यानमारपासून फक्त पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या या बेटाचे भू-सामरिक महत्त्व आहे.

गेल्या वर्षी शेख हसीना यांच्या पलायनानंतर भारताने युनूस यांच्या नेतृत्वाखालील सरकारशी थेट संघर्ष करण्यापेक्षा शांत राजनैतिकतेला प्राधान्य दिले आहे. हसीना यांना आश्रय दिल्याने इस्लामी-नियंत्रित युनूस सरकार नाराज झाले. हसीनांचे १५ वर्षांचे शासन भारत-बांगलादेश संबंधांमध्ये सर्वात उत्पादक आणि सौहार्दपूर्ण राहिले आहे. इस्लामिक अतिरेक्यांनी त्यांना जबरदस्तीने हटवणे हा भारतासाठी मोठा धक्का होता.

ब्रह्मपुत्र आणि गंगा नद्यांवर नियंत्रण आणि बांगलादेशला वीज पुरवठा यावरुन भारत बांगलादेशवर दबाव आणण्याच्या स्थितीत आहे. निवडणुका जवळ येत असताना हसीना अधिक बोलू लागल्या आहेत. ढाका सोडल्यानंतर गेल्या आठवड्यात त्यांच्या पहिल्या सार्वजनिक भाषणात त्यांनी युनूस सरकार आणि त्यांच्या कट्टर समर्थकांना उलथवून टाकण्याचे आवाहन बांगलादेशींना केले. भारत बीएनपीच्या विजयाची आशा करत आहे. जनमत सर्वेक्षणात बीएनपीला ७०% पेक्षा जास्त पाठिंबा मिळत असल्याचे दिसून आले आहे.

बीएनपी भूतकाळात भारतविरोधी होती. परंतु रहमान यांच्या नेतृत्वाखाली पक्षाने धर्मनिरपेक्ष, विविधता, आर्थिक विकासावर लक्ष केंद्रित करणारे आणि भारताशी सहकार्य करणारे सरकार चालवण्याची वचनबद्धता व्यक्त केली.

बीएनपीचा मुख्य प्रतिस्पर्धी जमात-ए-इस्लामी आहे. बीएनपी आणि जमातच्या कार्यकर्त्यांमध्ये हिंसक संघर्ष सुरू झाले आहेत. आता लीगला निवडणूक लढवण्यास बंदी घालण्यात आली आहे. बीएनपी मध्यम विचारसरणीकडे वळली आहे तर जमातने तीव्र अतिरेकी विचारसरणीकडे वाटचाल केली आहे.

लाखो निर्वासित बांगलादेशी पश्चिम बंगाल, आसाममध्ये राहतात. पाकिस्तान बांगलादेशात नवीन भारतविरोधी पूर्व पाकिस्तान निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. चीन बांगलादेशात पायाभूत सुविधा विकास प्रकल्प तयार करत आहे. अमेरिकेने बांगलादेशातही हालचाल वाढवली आहे.

रहमानची बीएनपी खरोखर समावेशक, सुधारणावादी सरकार स्थापन करू शकेल का? शेख हसीना अजूनही खात्री बाळगू शकलेल्या नाहीत. परंतु भारताला आशा आहे की एक दशकाच्या खंडानंतर बीएनपीच्या रहमानची भूमिका नरमाईची झाली असावी.

# श्री संत गजानन महाराज अद्भुत दैवी शक्ती

श्री संत गजानन महाराजांची महिमा अपरंपार आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळेच त्यांना ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज असे संबोधले जाते. कारण त्यांची महिमा संपूर्ण ब्रम्हांडात प्रचलित असल्याचे दर्शविते.

आज जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तर महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. महाराष्ट्रात अनेक थोर संत, महात्मे झालेत त्यातलेच संत गजानन महाराज आहेत.आपल्याला गजानन महाराजांचे अनेक चमत्कार दिसून येतात. त्याचप्रमाणे संपूर्ण भारतात शांततेचे प्रतिक म्हणून शेगावचे गजानन महाराजांचे मंदिर व तेथील परिसर प्रसिद्ध आहे.

संत गजानन महाराज माघ वद्य ७ शके १८०० (दिनांक २३ फेब्रुवारी १८७८) रोजी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे तारूण्याअवस्थेत प्रगत झालेत.आज संपूर्ण भारतात श्री संत गजानन महाराजांमुळे महाराष्ट्रातील शेगाव हे गाव प्रसिध्दीस आले. साधू देविदास पातूरकरांच्या मठाबाहेर पडलेल्या उष्ट्या पत्राळीतील अन्नाचे कण वेचून खात होते व गाईगुरांकरीता ठेवलेले पाणी पिऊन निघून गेले.

ते पुढे बार्शी येथील ब्रम्हनिष्ठ श्रीगोविंद महाराज टाकळीकर यांचे शेगावी महादेवाच्या मंदिरात कीर्तन झाले. त्याप्रसंगी टाकळीकरांच्या बेफाम असलेल्या घोड्यांच्या चौपायांत श्री गजानन महाराज हे ब्राह्मानंदी निमग्न होऊन निजलेले आढळले परंतु तुफान घोडा शांत झाला. अशाप्रकारे तुफान घोड्याला गजानन महाराजांनी शांत केले.

तत्काळ गोविंदमहाराजांनी संत गजानन महाराजांची योग्यता ओळखुन भक्तीभावाने पूजा केली व त्यांची महती शेगाव निवासी लोकांना सांगितली. तेव्हापासुनच संत श्री गजानन महाराजांची प्रसिद्धी झाली.

यानंतर महाराजांचे अनेक चमत्कार लोकांना दिसून आले. बंकटलाल अग्रवाल यांना गजानन महाराज प्रथमच दिसले असता गण गण गणात बोते असे उच्चारत त्यांचे भजन नेहमीच सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांना गजानन महाराज ही अद्भुत शक्ती असल्याचे लक्षात आले व गण गण गणात बोते हा जाप सर्वांच्याच हृदयात बसला व गजानन महाराजांची महीमा संपूर्ण शेगावी पसरली.



गजानन महाराजांचे अनेक चमत्कार आपल्याला वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या रूपात पहायला मिळतात. महाराजांच्या तीथार्नेच जानराव देशमुख नावाच्या गृहस्थ मरणोन्मुख स्थितीतुन बरे झाले. अनेक भक्तांना साक्षात पांडुरंगाचे दर्शन गजानन महाराजांनी घडविले. गजानन महाराज हे दिगंबर वृत्तीतील सिध्दकोटीला पोहचलेले महान संत होते.



रमेश कृष्णराव लांजेवार
स्वतंत्र पत्रकार, नागपूर.
९९२१६९०७७९

त्यांची दिनचर्या अशा पध्दतीची होती की वाटेल ते खावे, कोठेही पडुन रहावे व कोठेही संचार करावा अशा पध्दतीने ते रहात असे. एकेवेळी तर एका स्त्रीने मिर्चीचा वाटलेला मोठा गोळा खायला दिला तो गोळा त्यांनी मोठ्या आनंदाने खाल्ला जनुकाय पेढे-बर्फी खातात. लोटाभर पाणी पिऊन तृप्त झाले गण गण गणात बोते असे अहर्निश भजन उच्चारत निघून गेले.

गजानन महाराजांच्या मुखातून नेहमीच गण गण गणात बोते या शब्दांचे उच्चारण व्हायचे त्यामुळे संपूर्ण भक्तगण श्री संत गजानन महाराज म्हणुन संबोधू लागले. गजानन महाराजांची अपार महिमा पाहून लोक त्यांना बहुमोल वस्त्रे, अलंकार, पैसे, खाद्य पदार्थ अर्पण करीत.परंतु हे सर्वच तेथेच टाकून निघून जात असे.

मुख्यत्वेकरून भक्तांना व जनतेला गजानन महाराजांच्या सहवासाने मनःशांति मिळे व त्यांच्या ईश्वरलिलेमुळे सर्व भक्तगण प्रसन्न रहात. आजही महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात श्री संत गजानन महाराजांची पुजाअर्चना मोठ्या भक्तिभावाने व उत्साहाने साजरी केली जाते. त्याच अनुषंगाने दरवर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला श्री संत गजानन महाराजांचा प्रगट दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.

यावर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला दिनांक ८ फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने गजानन महाराजांचा १४८ वा प्रगट दिवस साजरा होत आहे. दरवर्षी विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेगाव वरून संत गजानन महाराजांची पालखी जात असते व पालखी सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होतो.

गजानन महाराजांनी विठ्ठल रूपी अनेकांना दर्शन दिले आहे. दररोज शेगावला हजारोंच्या संख्येने वेगवेगळ्या भागातुन भाविक श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येतात.

याठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते. महाराष्ट्रात घरोघरी गजानन महाराजांची पुजाअर्चना करून भक्तीभावाने संत गजानन महाराजांचा गजर करतात व आपली मनोकामना पूर्ण करतात.

प्रगट दिनाच्या निमित्ताने अनेक गावांत, शहरात मोठ्या प्रमाणात भजण, किर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते व आपल्याला सर्वत्र संत गजानन महाराजांचा गजर ऐकायला मिळतो. संत गजानन महाराज हे महान संत होऊन गेले त्यामुळे त्यांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे.

जंगल तोडीमुळे संपूर्ण निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे . याचाच परिणाम आपल्यालाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावा लागतो आहे. आपण निसर्गाचे संतुलन व्यवस्थित ठेवले नाही तर सुनामी, भूकंप, वनवा लागणे, समुद्राची पातळी वाढणे, अती थंडी, अती उष्णता, अती पाऊस, भुस्खलन याला मोठ्या प्रमाणात उफान येवू शकते.

यामुळे मानवास, पशु-पक्षी, जीवजंतू यांची मोठी हानी होवू शकते. याकरीता आज निसगार्ला वाचविण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे.

आपण व संपूर्ण भक्तगणांनी श्री संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवड केली तर निसर्ग प्रफुल्लित राहिल व प्रत्येक झाडांच्या पानात, फुलात, फळात आपल्याला गजानन महाराजांचे दर्शन अवश्य होईल. गजानन महाराजांचे संपूर्ण जीवन हे झाडांच्याच सानिध्यात रहाले आहे.

वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन व सावली मिळेल. यातच आपल्या साक्षात संत गजानन महाराज अवश्य दिसून येईल व आपण केलेल्या कार्याचे सार्थक होईल.

भक्तांना आग्रहाची विनंती आहे की प्रगट दिनाच्या निमित्ताने जास्तीत जास्त वृक्षारोपण व्हावे या दृष्टिकोनातून पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे.

# खव्वय्येगिरी

खव्वय्येगिरी आणि खादाडपणा ह्यात जुने भारतीय सिनेसंगीत आणि आजकालचे रॉक फॉक टाइपचे दडाम धडाम म्युझिक असा फरक आहे. खव्वयेगिरी मध्ये नुसते खाणे हीच कृती नसून त्यात प्रत्येक घासा सोबत त्या त्या घासाच्या किंचित किंचित बदलत्या चवीचा आणि स्वादाचा आस्वाद घेणे, त्या विलक्षण अनुभूतीसाठी डोळे, नाक, हात, दात, रसना म्हणजे जीभ आणि अंतिमतः उदर या समस्त अवयव संच्याच्या द्वारे तृप्ति नावाच्या स्वर्गीय आनंदाचा प्रत्यय घेणे, एव्हढी आनंदमय प्रक्रिया साखळी असते.

सुरवातीला पदार्थाला डोळे भरून बघावे,डोळे तृप्त करत करत नाकाने त्याचा येणारा दरवळ दीर्घ श्वसन करत नाकाची तृप्ति मिळवावी, मग हाताने स्पर्श करून, केव्हा केव्हा गोंजारून, हवा हवासा वाटणारा त्या पदाथार्चा स्पर्शाने हस्त तृप्ति, मग हळूच तो घास मुखात घेताना त्याला झालेल्या दांत आणि रसनेच्या स्पशार्मुळे ज्ञात होणारी अप्रतिम चव याने मुख तृप्ति, तदनंतर जवळ जवळ रवंथ केल्याप्रमाणे स्वाद घेत घेत पदार्थ घासा, घासाने संपवून आलेली उदरभरणाची जाणीव आणि तृप्ति, आहाःहः! अश्या प्रकारे पंच अंगांनी तृप्त होणे, याला म्हणतात अस्सल भारतीय खव्वयेगिरी !

खादडपणा म्हणजे खाद्यपदार्थांशी धस्मुसळेपणाने वागणे. नुसते ओरबाडल्यासारखे पदार्थास घेऊन बकबका तोंडात कोंबून गिळण्याची राक्षसी कृती.

अस्सल भारतीय खव्वयेगिरी मध्ये असलेल्या आनंदमयी प्रक्रिया साखळीमुळे आपल्याला गोड, आंबट, खारट, तिखट, कडू आणि तुरट ह्या षड्रसभरीत अन्न पदार्थांचा असा आस्वाद घेतायेतो, की नुसते पोटच नाही तर मन आणि आत्मा देखील आनंदविहार करीत आहे असे आपल्याला जाणविते.

या प्रक्रियेदवारा अन्नप्राशन केल्याने अन्नाचे पचन देखील चांगले होते. परंतु जर आपण भोजनक्रिया आधाशी पणे खादाडखाऊ प्रकारे पार पडली तर पचनशक्ती बिघडते. आम्लपित्त म्हणजेच ॲसिडिटी , अपचन , उदरवायू म्हणजेच गॅसेस, कफ सारख्या आजारांना आमंत्रण देणे होते.

अस्सल भारतीय खव्वयेगिरी करिता भारतीय भोजनाची व्यंजने हीच सर्वोत्तम मानली गेली आहेत. कारण आपल्या भारतासारख्या खंडप्राय देशात, हिमालयाच्या पासून रामेश्वरमच्या हिंदीमहासागर पर्यन्त अफाट भूमीत अगदी बर्फाच्छादित प्रदेशा पासून, वाळवंटी अतिउष्ण परिसर, हिरवळींनी युक्त सपाट गवताळ सुपीक, गहू तांदूळ, मका, ज्वारी पिकविणाऱ्या प्रदेशापासून पाणथळ दलदलीचा प्रदेश, समुद्रकिनारपट्टी च्या नारळ,काजू, सुपारी, फणस सारख्या पासून उष्ण प्रदेशातील खजूर, खारीक, अक्रोड सारख्या पिकांच्या समृद्धतेने नटलेल्या आमच्या भारतवर्ष भूमीत, तितक्याच विविध प्रकारच्या जनसामुहांची पण रुजवात झाली.

आपआपल्या प्रदेशातील हवामानानुसार, पचनास सुलभ असे शाकाहारी तथा मांसाहारी अतिविविध प्रकारचे, आयुर्वेदाच्या आधारित पौष्टिक, चविष्ट पदार्थ याच जनसामुहांचीच देणगी आहे. हे पदार्थ बनविण्याच्या पाकक्रिया ह्या देखील अतिविविध आहेत. त्या नुसारच असलेले पदार्थ हे त्या त्या प्रदेशांच्या नावाने जगप्रसिद्ध झाले आहेत.

जसे लोकप्रिय पंजाबी पदार्थ सरसोका साग, मक्काई की रोटी, छोले भटूरे, पनीर मसाला, राजमा मसाला, बटर चिकन, चिकन तंदुरी, अमृतसरी कुलचा, नान, लच्छा पराठा. राजस्थानी पदार्थ, जसे दाल बाटी चुरमा,गट्टे की सबजी,लाल मांस, पापड की सबजी, बाजारे की रोटी, मिस्सी रोटी, घीवर, मालपुवा, बादाम का हलवा, गुजराती पदार्थ, ढोकळा, खाकरा, ठेपला, खामण, गाठीया, मराठी पदार्थ साबुदाणा खिचडी, थालीपीठ, पुरणपोळी, कोथिंबीर वादी, बटाटेवडा, आळूवडी, भाकरी, वरण भात, सोळकढी, उसळी, वडे,कोल्हापुरी मटन , सावजी मटन, मालवणी फिश करी, बासुंदी, दक्षिण भारतीय पदार्थ, इडली, डोसा, अप्पे, उतप्पम, सांभार, रस्सम, वेगवेगळे भात, तामिळ किंवा केरळा फिश करी.

आता हा काही उपहारगृहाचा मेनू नव्हे. तर त्या त्या प्रदेशांगिक पदार्थांची यादी त्या त्या परदेशात उत्तपन्न होणाऱ्या वस्तूंनाच्या उपयोगाने कसकसे उत्तम पदार्थ बनविता येतात आणि ते त्या त्या प्रदेशच्या वातावरणाला सूट करणारे असतात.



डॉ. अविनाश प. परांजपे
वानाडोंगरी, हिंगणारोड,
नागपूर.

आपल्याला असेही जाणवते की पंजाबी डिशेष ह्या सरदारजी किंवा पंजाबी व्यक्तींनीच बनविल्या तरच, राजस्थानी पदार्थ राजस्थानी लोकांनी,मराठी पदार्थ मराठी लोकांनी व दक्षिणात्य पदार्थ त्या, त्या लोकांनी बनविले तरच आपल्याला त्या प्रकारे खरे रुचकर लागतात. म्हणूनच घरी डोसा बनविण्यास आणलेल्या आयत्या डोसा बॅटर चे घरी केलेले डोसे साऊथ इंडियन रेस्टोरेंट एव्हढे चांगले कधीच लागत नसतात.

इतक्या समृद्ध खाद्यसंस्कृती असलेल्या देशातील लोक आज केवळ आपले स्टेटस दाखविण्यासाठी किंवा फॅशन म्हणून ते पाश्चिमात्य पिज्झा, बर्गर, सँडविच, वगैरे केवळ मैदयाचे पदार्थ खातात किंवा चायनीज नावाने व्हीनेगार सॉस टाकलेले केमिकल युक्त पदार्थ का खातात याचे इतर देशातील विचारवंत लोक आश्चर्य व्यक्त करतात . कारण आज भारतातील आजारांचे मूळ कारण हे असले परदेशी मैदा व केमिकल पदार्थच आहेत.

परंतु आज आपल्या देशास राजकीय स्वातंत्र्य मिळून पाऊणशेच्या पेक्षा जास्त वर्षे उलटून ही आमच्या लोकांची मानसिकता मात्र गुलामीचीच असलेली का बरे आढळावी? आमचे स्वदेशी ते टाकाऊ, जुनाट, गुणवत्ता नसलेले असेच असून परदेशी ते गुणवत्तापूर्ण, उत्कृष्ट , नाविन्यपूर्ण असतेच असली भावना म्हणजे देशद्रोही भावनाच आहे. असल्या भावना असलेले लोक आपल्या उद्याच्या पिढ्यांचे नुकसान करीत आहेत. याचे दृश्य रूप म्हणजे इंग्लिश मिडियमचा अतिरेक. आजकालच्या बालकांना इंग्लिश समजत नाही, आणि मातृभाषा येत नाही. फक्त पाठांतराच्या जोरावर मार्क्स मिळालेले दिसून येतात पण समजलेले नसते.

त्यांना मातृभाषेत निदान सातवी पर्यन्त शिकवावे, आठवी ते दहावी सेमी इंग्लिश मिडियम आणी त्यानंतर इंग्लिश मिडियम असा क्रम ठेवल्यास अति उत्तम असते. शेवटी दुसयार्ची नक्कल किंवा कॉपी करणे हे काही माणसाला मोठे बनवत नाही. भारतीय खावे,भारतीय शिकावे, भारताला मोठे बनवावे हेच ध्येय असणे केव्हाही वंदनीय असतेच ना !

# 'बॉर्डर २'ची घोडदौड; मराठीचा टक्का वाढला

२०२६ या वर्षाची सुरुवात भारतीय सिनेसृष्टीसाठी अत्यंत नफा देणारी ठरली आहे. जानेवारी महिना संपून फेब्रुवारीच्या सुरुवातीला बॉक्स ऑफिसचे आकडे समोर आले असून, यात सनी देओल स्टारर 'बॉर्डर २'ने अपेक्षेप्रमाणे नवीन विक्रम प्रस्थापित केले आहेत. दुसरीकडे, मराठी चित्रपटांनीही आपल्या दर्जेदार कथानकाच्या जोरावर प्रेक्षकांना थिएटरकडे खेचून आणण्यात यश मिळवले आहे. बॉलिवूडमध्ये सध्या केवळ 'बॉर्डर २' चीच चर्चा आहे. २३ जानेवारी रोजी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाने प्रजासत्ताक दिनाच्या सुट्ट्यांचा पुरेपूर फायदा उठवत अवघ्या १० दिवसांत जगभरात ३४३ कोटी रुपयांचा टप्पा ओलांडला आहे. ट्रेड विश्लेषकांच्या मते, या चित्रपटाची भारतातील निव्वळ कमाई २७७ कोटींच्या पार गेली असून, २०२६ मधील हा पहिला ब्लॉकबस्टर चित्रपट ठरला आहे. सनी देओलचा स्क्रीन प्रेझेन्स आणि वरुण धवन-दिलजीत दोसांझ यांची साथ प्रेक्षकांना प्रचंड भावली आहे. १ जानेवारीला प्रदर्शित झालेल्या 'क्रांतीज्योती विद्यालय मराठी माध्यम' या चित्रपटाने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला आहे. हेमंत ढोमे दिग्दर्शित या चित्रपटाने आतापर्यंत २९.०२ कोटी रुपयांचा गल्ला जमवला असून मराठीतील सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांच्या यादीत स्थान मिळवले आहे. त्यापाठोपाठ 'अग अग सूनबाई...' या कौटुंबिक चित्रपटानेही ७.७१ कोटी रुपयांची सन्मानजनक कमाई केली आहे. ३० जानेवारी रोजी प्रदर्शित झालेल्या राणी मुखर्जीच्या 'मर्दानी ३' ने पहिल्या विकेंडला १०.२ कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटाचे रिव्ह्यू सकारात्मक असल्याने आगामी आठवड्यात कमाई वाढण्याची शक्यता आहे.






# रणपती, वध २ ची प्रतीक्षा

फेब्रुवारी महिन्याचा पहिला आठवडा सिनेरसिकांसाठी मनोरंजनाचा मोठा धमाका घेऊन आला आहे. येत्या ६ फेब्रुवारी २०२६ रोजी चित्रपटगृहांमध्ये मराठी आणि हिंदी भाषेतील अनेक बहुप्रतिक्षित चित्रपट एकाच वेळी प्रदर्शित होत आहेत. ऐतिहासिक मोहिमांपासून ते अंगावर काटा आणणाऱ्या क्राईम थ्रिलरपर्यंत विविध विषयांची मेजवानी प्रेक्षकांना मिळणार आहे. या आठवड्यातील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित रणपती शिवराय: स्वारी आग्रा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आग्रा मोहिमेचा रोमहर्षक इतिहास या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर उलगडला जाणार आहे. शिवराज अष्टक मालिकेतील हा चित्रपट आधी ३० जानेवारीला येणार होता, मात्र आता तो ६ फेब्रुवारीला प्रदर्शित होत आहे. या ऐतिहासिक महागाथेत अभिनेता अभिजीत श्वेतचंद्र महाराजांच्या भूमिकेत दिसणार असून अजय देवगणनेही या चित्रपटाच्या ट्रेलरचे कौतुक केले आहे. दुसरीकडे, हिंदी चित्रपटसृष्टीतून 'वध २'हा बहुचर्चित सिक्वेल मैदानात उतरत आहे. संजय मिश्रा आणि नीना गुप्ता यांच्या दर्जेदार अभिनयाने सजलेला हा क्राईम थ्रिलर पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या बुद्धीला चालना देण्यास सज्ज आहे. पहिल्या भागाच्या यशानंतर या दुसऱ्या भागाकडूनही मोठ्या अपेक्षा व्यक्त केल्या जात आहेत. हॉरर चित्रपटांची आवड असलेल्या प्रेक्षकांसाठी विक्रम भट्ट यांचा 'हॉन्टेड ३डी: घोस्ट्स ऑफ द पास्ट' हा चित्रपट ३डी स्वरूपात भीतीचा नवा थरार घेऊन येत आहे. विनोदी मनोरंजनाची आवड असणाऱ्यांसाठी छोट्या पडद्यावरील लोकप्रिय पात्रे भाभीजी घर पर है! फन ऑन द रन या चित्रपटातून मोठ्या पडद्यावर धम्माल उडवणार आहेत.



# चर्चा मंदार विरुद्ध शशांक प्रकरणाची



मराठी मालिकाविश्वात सध्या अभिनेता शशांक केतकर आणि दिग्दर्शक मंदार देवस्थळी यांच्यातील वादाची मोठी चर्चा सुरू आहे. मंदार देवस्थळी यांनी पाच लाख रुपये थकवल्याचा आरोप शशांकने केल्याने खळबळ उडाली होती. अशातच 'झी मराठी'वरील 'माझे पती सौभाग्यवती' या मालिकेत मंदार देवस्थळींसोबत काम केलेल्या अभिनेत्री नंदिता पाटकर हिने आपला अनुभव शेअर केला आहे. नुकत्याच एका मुलाखतीत नंदिताला शशांक केतकर आणि मंदार देवस्थळी वादावर तिचे मत विचारण्यात आले. त्यावर उत्तर देताना नंदिता म्हणाली, 'माझा अनुभव त्यांच्यासोबत खूप चांगला होता. तेव्हा त्यांचे असे काही प्रॉब्लेम्स नव्हते. 'माझे पती सौभाग्यवती' ही माझी पहिलीच मालिका होती आणि मला मालिकेचा काहीच अनुभव नव्हता. मंदार यांच्याकडून मला खूप काही शिकायला मिळाले.' नंदिताने पुढे सांगितले की, जसे परेश मोकाशी माझ्या पहिल्या चित्रपटाचे दिग्दर्शक होते, तसेच मंदार देवस्थळी हे माझे मालिकेतील पहिले दिग्दर्शक आहेत. ते अत्यंत सर्जनशील दिग्दर्शक आहेत. ते सीन करण्यापूर्वी नाटकाच्या पद्धतीने तालमी घ्यायचे, कोरिओग्राफी करायचे आणि इमोशन्स कसे आणायचे हे शिकवायचे. ते खूप इंटरेस्टिंग काम करतात. मुद्दाम कोणाचे पैसे थकवतील असे मला वाटत नाही. एकीकडे शशांक केतकरने फसवणुकीचे गंभीर आरोप केले असताना, नंदिताने मात्र त्यांच्या कामाच्या पद्धतीचे कौतुक केले आहे, ज्यामुळे या वादाला आता वेगळे वळण मिळण्याची शक्यता आहे.

# परमसुंदरी ब्लॅक ड्रेसमध्ये

बॉलिवूडची फॅशन आयकॉन म्हणून ओळखली जाणारी अभिनेत्री सोनम कपूर नेहमीच आपल्या अनोख्या स्टाईलने चाहत्यांना भुरळ घालत असते. सध्या सोनम तिच्या दुसऱ्या प्रेग्नंसीमुळे चर्चेत आहे. अशातच तिने तिचे काही नवीन फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत, ज्यात तिने काळ्या रंगाचा अतिशय स्टायलिश ड्रेस परिधान केला आहे. सोनमचा हा मॅटर्निटी लूक सध्या इंटरनेटवर तुफान व्हायरल होत आहे. सोनमने या फोटोशूटसाठी एक स्लीक ब्लॅक ड्रेस निवडला आहे, जो तिच्या व्यक्तिमत्वाला अधिक उठावदार बनवत आहे. या आउटफिटमध्ये सोनमचा बेबी बंप स्पष्टपणे दिसत असून तिच्या चेहऱ्यावर एक वेगळाच ग्लो दिसून येत आहे. फॅशनच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करणाऱ्या सोनमने या लूकमध्ये ग्लॅमर आणि कम्फर्टचा उत्तम मेळ साधला आहे. आपला लूक पूर्ण करण्यासाठी सोनमने अतिशय साधा पण प्रभावी मेकअप केला आहे. न्यूड लिपस्टिक आणि विंग्ड आयलायनरमुळे तिचे डोळे अधिक आकर्षक दिसत आहेत. सोबतच तिने गळ्यात एक नाजूक नेकलेस आणि हातात आकर्षक अंगठ्या परिधान केल्या आहेत. मोकळे केस आणि तिची पोज देण्याची पद्धत यामुळे हे फोटो एखाद्या मॅगझिनच्या कव्हर पेजसारखे वाटत आहेत. सोनमने हे फोटो शेअर करताच त्यावर कमेंट्सचा वर्षाव सुरू झाला आहे.

'प्रेग्नेंसीमध्ये इतकं स्टायलिश कसं दिसता येतं हे सोनम कडून शिकावं' अशी प्रतिक्रिया एका चाहत्याने दिली आहे, तर अनेकांनी तिला ब्लॅक ब्युटी आणि क्वीन ऑफ फॅशन म्हटले आहे. सोनम कपूरचा हा लूक सध्या प्रेग्नेंट महिलांसाठी फॅशन इंस्पिरेशन ठरत आहे.



# अजितदादांना श्रद्धांजली



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला असताना, बिग बॉस मराठी ६ च्या मंचावरही त्यांचे स्मरण करण्यात आले. यावेळी भाऊचा धक्का विशेष भागाची सुरुवात अभिनेता आणि सूत्रसंचालक रितेश देशमुख याने अजित दादांना भावूक श्रद्धांजली अर्पण करून केली. महाराष्ट्र नि:शब्द झालाय! कार्यक्रमाच्या सुरुवातीला रितेश देशमुख अत्यंत भावूक झाला होता. तो म्हणाला, '२८ जानेवारीचा सूर्य सकाळ घेऊन येण्याऐवजी काळरात्र घेऊन आला. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय अजित पवार जी यांचे अपघाती निधन झाले. ही घटना केवळ राजकीय हानी नाही, तर ती माझ्यासारख्या अनेक महाराष्ट्रप्रेमींना वेदना देणारी आहे. ते फक्त उपमुख्यमंत्री नव्हते, तर ते आपले लाडके दादा होते.' रितेशने अजित पवारांच्या कार्यशैलीचे कौतुक करताना म्हटले की, शब्दांनी, शैलीने आणि नजरेतील धाकाने समोरच्याला नि:शब्द करण्याची ताकद तुमच्यात होती. पण तुमच्या जाण्याने आज अख्खा महाराष्ट्र नि:शब्द झाला आहे. तुमचे व्यक्तीमत्व म्हणजे शिस्त, माया आणि सामाजिक जाणिवेचा त्रिवेणी संगम होता. अनेक वर्ष रखडलेली कामे तुमच्या एका आदेशावर मार्गी लागायची. तुम्ही खऱ्या अर्थाने सामान्य माणसाच्या आयुष्यातील कामाचा माणूस होता. अजित पवारांच्या निधनानंतर सोशल मीडियावरही त्यांच्या चाहत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी मोठी हळहळ व्यक्त केली आहे.

# 'राजासाब'सह अनेक बिगबजेट ओटीटीवर

फेब्रुवारी महिन्याचा पहिला आठवडा ओटीटी प्रेमींसाठी अत्यंत खास ठरणार आहे. ६ फेब्रुवारी रोजी नेटफ्लिक्स, जिओ हॉटस्टार आणि प्राइम व्हिडिओ यासारख्या प्रमुख प्लॅटफॉर्मवर अनेक बिगबजेट चित्रपट आणि बहुप्रतिक्षित वेब सिरीज प्रदर्शित होत आहेत. चित्रपटगृहातील गर्दी टाळून घरबसल्या दर्जेदार सिनेमा पाहणाऱ्या प्रेक्षकांसाठी ही मोठी मेजवानी ठरणार आहे. या आठवड्यातील सर्वात मोठे आकर्षण म्हणजे साऊथ सुपरस्टार प्रभासचा द राजा साब. थिएटरमध्ये धुमाकूळ घातल्यानंतर आता ६ फेब्रुवारीपासून हा हॉरर-कॉमेडी चित्रपट जिओ हॉटस्टार प्रसारित होणार आहे. तेलगू, तमिळ, हिंदीसह एकूण पाच भाषांमध्ये हा चित्रपट उपलब्ध असून, यात प्रभासचा एक वेगळा अवतार प्रेक्षकांना पाहायला मिळणार आहे. तसेच तमिळ स्टार शिवकार्तिकेयन यांचा सामाजिक-राजकीय ड्रामा पाराशक्ती हा चित्रपट झी ५ वर याच दिवशी प्रदर्शित होत आहे. नेटफ्लिक्सवरही जागतिक स्तरावरील कंटेंटची रांग लागली आहे. बुद्धिबळ सम्राज्ञी जुडित पोल्गर यांच्या आयुष्यावर आधारित 'क्वीन ऑफ चेस' ही डॉक्युमेंटरी ६ फेब्रुवारीला जगभर प्रदर्शित होईल. तसेच कायदेशीर विषयातील थरार आवडणाऱ्या प्रेक्षकांसाठी 'द लिंकन लॉयर' या लोकप्रिय मालिकेचा चौथा सीझन ५ फेब्रुवारीच्या मध्यरात्रीपासून उपलब्ध झाला आहे. निसर्गप्रेमींसाठी ॲमेझॉन प्राइम व्हिडिओवर केट विन्स्लेट यांनी सूत्रसंचालन केलेली 'फाइंडिंग हार्मोनी: अ किंग्स व्हिजन' ही डॉक्युमेंटरी विशेष आकर्षणाचे केंद्र ठरेल. याव्यतिरिक्त, कपिल शर्माचा 'किस किसको प्यार करू २' आणि दाक्षिणात्य चित्रपट 'नारी नारी नदुमा मुरारी'हे चित्रपटदेखील याच आठवड्यात ओटीटीवर दाखल होत असून फेब्रुवारी महिन्याचा हा विकेंड प्रेक्षकांसाठी फुल-ऑन एंटरटेनमेंट घेऊन आला आहे.



# सासरेबुवा प्रसाद ओक!



मराठी चित्रपटसृष्टीतील अष्टपैलू अभिनेता, दिग्दर्शक आणि निर्माता प्रसाद ओक यांच्या घरात सध्या आनंदाचे वातावरण आहे. प्रसाद ओक आणि मंजिरी ओक यांचा मोठा मुलगा सार्थक ओक याचा साखरपुडा नुकताच पार पडला असून, तेव्हापासून ओक कुटुंबाची होणारी सून कोण, याबाबत चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता होती. आता याबद्दलची सविस्तर माहिती समोर आली आहे. प्रसाद ओकच्या होणाऱ्या सुनेचे नाव रितू असे आहे. रितू ही कलाक्षेत्रातील नसून ती वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहे. तिने तिचे उच्च शिक्षण जर्मनीमध्ये पूर्ण केले असून ती पेशाने एक फिजीओथेरपिस्ट आहे. विशेष म्हणजे सार्थक ओक देखील त्याच्या उच्च शिक्षणासाठी काही काळ परदेशात होता, तिथेच या दोघांची ओळख झाल्याचे बोलले जात आहे. सार्थक आणि रितूचा साखरपुडा अत्यंत थाटामाटात पार पडला. या सोहळ्याला मराठी चित्रपटसृष्टीतील स्वप्नील जोशी, समीर चौघुले, अमृता खानविलकर यांसारख्या दिग्गज कलाकारांनी हजेरी लावली होती. अभिनेत्री अमृता खानविलकरने सोशल मीडियावर या सोहळ्याचे फोटो शेअर करत या जोडीचे नाव रितू-सार्थक असल्याचे स्पष्ट केले होते. सध्या सोशल मीडियावर एक व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे, ज्यामध्ये सासू मंजिरी ओक आपली भावी सून रितूला तयार करताना दिसत आहेत. पिवळ्या रंगाच्या नऊवारी साडीत रितूचे सौंदर्य खुलून आले असून ओक कुटुंबाने तिचे प्रेमाने स्वागत केले आहे. चाहत्यांकडून या नवीन जोडीवर आणि ओक कुटुंबावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. लग्नाची तारीख अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही, मात्र लवकरच ओक यांच्या घरी सनईचौघडे वाजणार आहेत.